वऱ्हाड समाचाराचा किमत
वर्षाचा आगाऊ रु० ५ डांक हाशील ०१३
साहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास .....०४

नोटिशीचा
१० ओळीचे आत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे वेपेस .....०१

SUBSCRIPTION
Rs.
Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly.....3 " 8 as
Single copy.....4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

VOL XXVI AKOLA MONDAY 3 OCTOBER 1892 NO 39

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख ३ माहे आक्टोबर सन १८९२ इ० अंक ३९

डा० वामन गोपाळ यांचा
सार्सपरिल्ला

हा सार्सपरिल्ला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग जसे सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें वफोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फाफरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुस्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तानडतोड नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व मरणशक्तिचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जतंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून किती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करज्य व पिंगट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्हो. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकुर द्वारासमोर.

नोटीस

रा. रावजी वल्लद भवानी कुनबी कराळे पाटील रहाणार मौजे वाई परगणें पनज माहागांव तालुके अकोट यांसः-

नोटीस देणार बापुजी वा। इसाजी कुनबी कराळे पाटीलतर्फे मुखत्यार गंगाराम वा। बापुजी पाटील कराळे राहणार मौजे वाई परगणे पनज माहागांव तालुके अकोट— नोटीशीनें असें कळविलें जातें कीं, मराजी वल्लद सयमुलजी कराळे राहणार अकोली जहागीर मयत याचीं स्थावर व जंगम जिनगी तुझी वेतली होती. त्याजबद्दल सरकारांत काम चालून आल्ही त्याचे वारस ठरलो व त्यावेळीं स्थावर जिनगी मराजीची तुझी आह्मांस दिली. बाकी जंगम जिनगी तुमचे पाशीं राहिली तो लिहिले प्रमाणें बैल तीन ३, ह्मशी दोन२, व गाय १ यांची किंमत रुपये २५०, गाडें एक किंमत रु. २५ चे, भांडीं रुपये ३०, कडबा, कुटार व शेतीचें सामान मिळून रु. ४७, नवारी खंडी चार ४ रु. १०० ची, व चांदी सोन्याचे दागिने मिळून रु. १९० अशी सदरील सर्व जंगम जिनगी रु. (६०२) सहाशें दोनची तुझी आज तीन वर्षें उपयोग करीत आहां. याज करितां व आमची आह्मांस पाहिज म्हणून तुम्हांस कळविलें जातें कीं आज तीन वर्षांचें व्याज दरशेकडा रु-२ प्रमाणें व्याजाचे रुपये ४३३ अदपासें व ऐन रुपये ६०२ मिळून रुपये एकंदर १०३५ एक हजार पसतीस ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसात आणून देऊन निकाल करावा. असें जाहालें नाहीं तर रितो प्रमाणें काम चालऊन अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान व खर्च अणि ह्या नोटीशीचा खर्च असें सर्व भरून घेतलें जाईल म्हणून दिल्ही नोटीस सही ता. २९ माहे सपटंबर सन १८९२ इसवी.

(सही)
सही बापुजी वल्लद इसाजी कराळे
पाटील तर्फे कुलमुत्यार गंगाराम
वल्लद बापुजी पाटील कराळे
मौजे वाई दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकुर पत्रकर्त्यांच्या मतांस मिळूनच असतील असें समजूं नये.

वाशीम

(रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. ची परिक्षेंत पसार झाले त्यावेळीं वऱ्हाडप्रांताचें विद्याखात्याचे डायरेक्टर मि. आर. इ. क्यांडी होते त्यावेळीं एम. ए. च्या परिक्षेंत इंग्रजींत कांहीं विषयावर पद्य लिहावयाचें होतें. तो विषय पद्यात्मक असतां ही अण्णा साहेबांनीं इतक्या उत्कृष्ट रितीनें प्रतिपादन केला होता कीं त्यांतील मार्मिकांनीं ही माना डोलविल्या. त्याची कच्ची प्रत अण्णा साहेबांनीं परत आणली होती व त्या वेळेचे डायरेक्टर मि. क्यांडी यांना दाखविली होती. नोटेवानें अशी उत्तम लिहिलेली कविता पाहून त्यांस फार आनंद व अण्णा साहेबांच्या बुद्धी विषयीं आश्चर्य वाटलें. व अण्णा साहेबांबद्दल त्यांचा फारच उत्तम ग्रह झाला होता. मराठी भाषेंत त्यांनीं पद्यात्मक पुस्तकें बरींच लिहिलीं आहेत. तीं त्यांच्या मराठी विद्वत्तेबद्दल पुरी साक्ष देत आहेत. कांहीं दिवस अकोल्यास फ० अ० राहिल्यावर नारायणाच्या कृपेकरून उमरावती हायस्कुलांत मि. मॅकान्टाश त्यावेळचे हेडमास्तर यांच्यावर कांहीं किटाळ येऊन ते पार पडल्यावर त्यांना हेडमास्तर नेमिलें. त्यावेळीं फार चांगल्या रितीनें काम बजाविलें व मोडण्याच्या पंथास हायस्कूल अगदीं आलें होतें त्याला उत्तम मालिकेंत आणून सोडिलें. व त्याचा कित्ता प्रस्तुत केली. त्यांच्या हातांत बुद्धिवान मुलगा गेल्यावर त्याची बुद्धी अती वाढत असे. अण्णा साहेबांनीं काम उत्तम बजाविल्या मुळें त्यांना पन्नास रुपये परसनल् अलॉवंस मिळत असे. एव्हां पर्यंत अण्णा साहेबांचा परिचय विद्यार्थि जनास व इतर मोठ्या लोकांस मात्र होता परंतु पुढें रा. रा. बज्याबा रामचंद्र प्रधान एजुकेशनल इनस्पेक्टर यांना एप्रिल १८८६ इ० महिन्यात देवाज्ञा झाल्यावर सन मजकुरचे सपटंबरचे २२ चे मुमारास अण्णासाहेबांची एजुकेशनल इनस्पेक्टरचे जागीं नेमणुक झाली तेव्हां पासून आजसाहा वर्षें यांचा सर्व वऱ्हाडवासी जनांला परिचय झाला आहे. यांची परीक्षा घेण्याची शैली अगदी सोपी. परंतु बुद्धी कांहीं तरी असल्या शिवाय मुलगा पास होत नाहीं. यांची वाणी गोड. राग मुळींच नाहीं. आपला मुद्दा कधीं ही जाऊं द्यावयाचे नाहींत. कोणी कांहीं म्हटलें तरी तें शांतपणें ऐकून घेतात. यांचे विद्यार्थी सर्व प्रांतभर पसरले आहेत व मोठ मोठे योग्यतेस चढले आहेत. यांच्या संबंधें कोणाला ही कुरकुर करण्यास जागा नाहीं. कधीं कधीं कित्येक मास्तर लोक गिल्ला करितात कीं यांच्या हातून मार्क पडत नाहींत. ठिक आहे. ज्याला विद्येची किंमत बरोबर कळते त्याची कांटकसर ceonomy मार्कांच्या ठिकाणीं ही जर चालली तर यांत मोठेंसें नवल नाहीं. यांच्या साहा वर्षांच्या कारकीर्दीत कोणांचें नुकसान झालें नाहीं. यांची मिस्त केवळ संख्या पास करण्याकडे नसते. वर्गांत चाललेले विषय शिकविले किंवा नाहींत हें पाहाण्या कडे यांचें लक्ष फार असतें. यांनीं स्वतः शिक्षकाचा धंदा केलेला आहे तेव्हां मास्तरच्या रस्त्यावर कोणत्या अडचणी आहेत हें यांना पूर्ण पणें माहीत आहे या मुळें हे कोणाला छळत नाहींत. विष्णु आमचें कुलदैवत" असें अकोले हायस्कुलांतील विद्यार्थी यांना म्हणत असत. तात्पर्य रा. रा. श्रीराम भिकाजीच्या व ब-

ज्याबांच्या मागें योग्य इनस्पेक्टर आले असा सर्व लोकांचा ग्रह आहे. आतां त्यांना मुंबईस परीक्षक नेमिलें त्या बद्दल कांहीं सूचना कराव्याशा वाटतात. कारण आमच्या प्रांतात यांची गणना माहात्म्या मध्यें आहे. कदाचित् याच्या हातून कठिण कागद निघाला तर विनाकारण युनिव्हरसिटीच्या नेमणुकीच्या मनुष्या विरुद्ध उमेदवार लोकांचा गिल्ला वर्तमान पत्रांत दर वर्षाप्रमाणें यावयाचा तो येऊं नये व कठीण कागद निघून कोणाचें नुकसान होऊ नये या साठीं मुद्दाम लिहीणें आहे. परीक्षेस येणारे सर्वच बृहस्पति असतात असें नाहीं. परीक्षकांची आपली विद्वता उमेदवारांस दाखविण्याचा उद्देश नसावा व त्यांना काय येतें हें पाहाण्याचा उद्देश असला ह्मणजे पुरें पूर्वी केरु नाना छत्रे गणिताचे सर्व परीक्षेंतून परीक्षक असत त्यांची प्रश्न काढण्याची अशी तऱ्हा असे कीं पंचवीस मार्काचा प्रश्न अगदीं साधारण उमेदवाराला सोडविता येतील. दुसरे पंचवीस मार्काचे प्रश्न सोडविण्यास कांहीं तरी हुषारी पाहिजे. तिसरे पंचवीस मार्काचे सोडविण्यास बरीच बुद्धी. व चवथे पंचवीस मार्काचे सोडविण्यास त्या विषयांचें उत्कृष्ट ज्ञान ज्याला असेल तोच ते चवथे पंचवीस मिळवील. आतां या वरून पाहातां अगदीं कसा ही विद्यार्थी असला तरी पहिल्या पन्नास मार्काचे प्रश्न लिहणारा पास होत असे. ही नानांची तऱ्हा अनुकरणीय आहे. पुष्कळ वर्षें त्यांनीं परीक्षकाचें काम केलें हजारो रुपयांची युनिव्हरसिटीतून कमाई केली तरी यांच्या बद्दल कोणी ही गिल्ला केला नाहीं. अण्णासाहेब नानांचे विद्यार्थीच आहेत. नानांचा यांना चांगला परिचय होता. आतां नवीनच युनिव्हरसिटीमध्यें परीक्षक होण्याची वेळ आली आहे तर वाहवा मिळऊन उमेदवार लोकांपासून चांगलें ह्मणऊन घ्यावें व वर्तमान पत्रांच्या टिकेंत येऊं नये व माहात्मा हें नांव कायम राखावें. हे विनंती.

अजून पावसाला दमा येऊन तो थांबत नाहीं. रोज काम सुरू आहे. कोणतीही गोष्ट बेताची असली ह्मणजे हितावह होते. तीच अती झाल्यानें नकोशी होऊन त्रासास कारण होतें. त्याच प्रमाणें पावसाच्या संबंधें झालें आहे. त्याच्या नेमस्त वृष्टी पासून होणारा फायदा जाऊन अतीतात दुःखांत लोक पडले आहेत. पाऊसकाळचीं पिकें तर बहुतेक गेलीं. परंतु रब्बीच्या पिकांसही धोका बसण्याचा अदमास दिसतो. कारण अजून रब्बी करितां जमीन तयार करण्यांत आली नाहीं. व हलकी जमिनींतून गुडघ्या इतकें पाणी असून पावसाला सुरू आहे. तेव्हां रब्बीच्या पिकांची पुढें कशी स्थिति होईल हें एव्हांपासून दिसूं लागलें आहे. लोकांपाशीं धान्याचा पुरवठा नाहीं. हलकी महागाई होत चालली

आहे. तेव्हा गरीबांचे व्हावे कसे हा प्रश्न डोळ्यापुढें उभा राहतो. गरीबांस मोलमजुरीही वेळीं मिळत नाहीं. तेव्हां प्रसंग कठीण दिसूं लागला आहे. ओला दुष्काळ खास पडेल असें कित्येक शहाणे लोक भाकीत करीतात.

उद्या पासून श्री बालासाहेबांचे उत्साहास प्रारंभ होणार. हें श्रीजींचें संस्थान जाहगिरीवर चालतें. इतर कानगी वगैरे उपन्न फारसें नाहीं. संस्थानचा कारभार मिस्तर राजाभाऊ चालवितात. हे फार हुशार असून सर्व गोष्टीची व्यवस्था जेवढ्या तेथें नीट नेटकेपणानें ठेवितात. तीन हजार रुपये सुमारें उछाहा प्रीत्यर्थ दरसाल खर्च होतात. उत्साह फार चांगल्या रितीनें होतो. ह्या बद्दल शाबासकी कारभारी वगैरे मंडळीस आहे. उद्या पासून पर्जन्य कृपा करील तर उत्साहाचा प्रसंग साजरा होईल. नाहींतर मोठी दैना व हाल सोसून प्रसंग साजरा दिसणार नाहीं. व लज्जा रक्षण करणार श्री बालासाहेब समर्थ आहे.

पुण्य पत्तनांत फार दिवसा पासून ग्रामण्याचा ध्वनी चालला आहे. त्या मुळें आमचे येथील कांहीं जणांस चेव आला कीं काय नकळे अगर ग्रामण्य माजविण्यांत कांहीं मोठेपणा वाटतो काय कोण जाणे. हल्ली गांवांत क्षुल्लक कारणा वरून उगीच ग्रामण्या मुळें दुही माजत चालली आहे. आपल्या घरचीं व्यंगें जगाला दाखऊन असे प्रकार करणें अगदीं पसंत नाहीं. उभय पक्षां कडचे लोक शाहाणे आहेत. वजनदार आहेत. त्यानां चांगले वाईट समजण्याची ईश्वरानें चांगला बुद्धी दिली आहे. त्या बुद्धीचा योग्य उपयोग करून त्यांनीं आपसांत सर्व गोष्टी मिटवाव्यांत यांतच परस्परांचें हित असें समजावें. गंगातीरीं जाऊन उत्तर क्रिया केल्याचा दाखला असल्यास मग शंका घेण्याचें कारण नाहीं. त्रैलोक्यास पावन करणारा जी त्रिपथगा गंगा तिचे कांठीं केलेल्या कृत्यावर मग दंड कशाचा व त्या दंडा पासून शुद्धता ती काय? मोठे मोठे लोक आपापलीं घरें दारें सोडून मुद्दाम एखाद्याची उत्तर क्रिया करण्या करितां गंगातीरीं जातात असें जर आहे तर मग दोष तो कोणता राहीला? या ग्रामण्याची हकीकत सबड साधल्यास पुढें एकादे वेळीं देऊं. ते आपसांत तंटा मिटवितीलच यांत शंका नाहीं.

म्यूनिसिपल कमिटीनें लायब्ररीच्या संबंधें केलेलं नियम जनरल कमिटीनें तारीख १८।९।९२ रोजीं पसार केले. जनरल कमेटी म्हणावयाची पण लोक अवघे १५ च होते असें समजतें. ह्या नियमांपैकीं एक नियम असा आहे कीं वर्गणीचे दर उछन्नाप्रमाणें ठरविले आहेत. हा नियम बहुतांना संमत नाहीं. यामुळें व आणखी कांहीं नियम कित्येकांना पसंत नाहींत. सबब मंडळी राजी नाहीं असें कित्येक बोलतात. "नेटीव लायब्ररी" हें नांव मोडून जनरल लायब्ररी असें नांव ठेवावें असें मि० टॉमसन यांचें मत होतें त्या बद्दल भवती न भवती होऊन शेवटीं नेटीवच नांव कायम ठेवावें असें ठरलें. ह्या कामीं बरीच तक्रार झाली परंतु वकील लोकांनीं चांगला जोम धरीला व नांव राखिलें. चांगली गोष्ट झाली. लायब्ररीमुळें दोन पक्ष मंडळीं मध्यें होऊं पाहातात. ही गोष्ट चांगली नाहीं. कित्येक मंडळीच्या मनांत बालवक्तृत्वोत्तेजेक सभा येथें काढावयाची आहे. पहावें काय होतें. आज रोजीं मे० ए० इन्स्पेक्टर साहेब येथें यावयाचे आहत. मास्तर लोकांची धांदल उडाली आहे. कळावें हे विनंती. तारीख २२।९।९२

चार दिवसा पासून पाऊस कमी आहे उन्ह फार पडतें गांवांत तापाचा धाम आली आहे. बहुत लोक आजारी आहेत. या शिवाय आणखी अनेक आजार आहेत.

येथील शाळेची वार्षिक परीक्षा झाली. मे. एजुक्यशनल इनस्पेक्टर साहेब बहादुर यांची स्वारी आज आकोल्यास परत जाणार आहे. ता० २९।९।९२

आपला
"क्ष"

---

पातुर्डा—२१-९-९२

वि. वि. सध्यां उघाडी आहे परंतु झालेल्या अतिवृष्टीनें नदीला पूर बहुत आले, मळे बुडाले, आंबा, जांभूळ वगैरेचीं झाडें पुष्कळ वाहून गेलीं, कित्येक शेतांत दगड वाहत वाहत जमले, घरेदारें पडलीं व मोडलीं. अनेक प्रकारें नुकसान झालें.

येथील लायब्ररींत पंधरा दिवसा पूर्वी मोठी सभा भरली होती. त्यांत हिंदुमुसलमान लोकांनीं एकदिलानें हिंदुस्थानी शाळेंतील गरीब मुलासाठीं साडे अकरा रुपये वर्गणी जमविली. अध्यक्ष रा. रा. ठेंपेकटर व मुकुंदराव यांनीं उदूंत भाषण केलें. त्यानीं दोन वर्षें पर्यंत एका गरीब मुलाची फी देण्याचें कबूल केलें. स्कूल कमिटीतील सभासद काजी करामतुल्ला इत्यादिकांनीं वर्गणी मोठ्या संतोषानें यथाशक्ति दिली. या संबंधत रा. रा. लक्ष्मण पांडुरंग, अंबादास बाळकृष्ण व मिरनबक्ष यांनीं भाषणें सुरस केलीं.

वेदमूर्ति श्रीहरी बुवा सावंढे पैजपुर यांनीं येथें पुराणाचा व कीर्तनाचा सप्ता केला. विद्वत्तेत बुवा व्यासनारायणा प्रमाणें आहेत. यांच्या भजनीं कांहीं रंगारी शिष्य मंडळ तयार आहे. शेसव्वाशेची बुबांस प्राप्ति होऊन उत्साह व पालखी मोठ्या थाटावर निघाली.

कांहीं छोर व फैली तरुण लोक भररस्त्यावर दिवसारात्रीं बीभत्स, अचकटविचकट अशा तऱ्हेचें गाणें बजावणें बेधडक करितात. त्यांचा जाब घेणारा कोणी सत्वस्थ व धर्यवान अंमलदार नाहीं काय!

आपला 'ब्र'

---

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध १२ शके १८१४

---

## व्यायाम

शरीरास रोग जडल्या नंतर औषध घेतात असे लोक पुष्कळ; परंतु शरीरास रोग जडण्या पूर्वी व्यायाम घेतात असे लोक विरळा! शरीरास व्याधि जडली व प्रकृति अशक्त, दुर्बळ व परस्वाधीन होत चालली म्हणजे औषधोपचार करण्याचा परिपाठ आहे. मग शरीरस्वास्थ्या साठीं बेरोजगारीपणा पतकरतो, वैद्य व औषधें या प्रीत्यर्थ पैसा खर्च करवतो, आणि दिनवाणी पसरून लोकांची मदत मागवत इत्यादि सर्व कांहीं प्रकार करण्यास मनुष्य चुकत नाहीं. शरीर प्रकृतिच नीट नाहीं तर धनदौलत तृणवत् आहे असा पक्का शहाणपणाचा व वास्तविक खराखरा समज ठेंच लागल्यावर मनुष्याचा साहजिक होतो. परंतु आरंभींच शरीरास माफक व नेटाचा व्यायाम होईल असे खेळ खेळावे, तालीम करावे, दौड मारावी अगर निदान सहल करावें म्हणजे प्रकृति निरोगी, सदृढ व बळकट राहते हें पुष्कळजणांस सांगता येत पण त्या प्रमाणें वागता येतें नाहीं. व्यायामाबद्दल निबंध लिहिण्यांत वाकबगार बरेच लोक सांपडतील परंतु व्यायामाची योग्यता जाणून व्यायाम करणारे अपेक्षेक थोडे आढळतात. आमचा हेतु व्यायामाची आवश्यकता कळविण्याचा नाहीं कारण आजमितीला व्यायाम तत्वतः नको म्हणणारे बहुत करून कोणी निघणार नाहींत असें आम्ही समजतों. सुधारक असो अगर दुर्धारक असो व्यायामाच्या उपयोगा बद्दल कोणास शंका असण्याचा संभव नाहीं आणि तशी शंका घेणारे कित्येकजण निघतीलच तर त्यांस आम्ही एवढेंच कळवितो कीं आमचे जुने लोक शरीरसंपत्तीचें वैभव मोठें मानीत असत आणि जे लोक जगांत याच संपत्तीनें श्रीमान आहेत त्यांच्याच गळ्यांत जयश्रीनें माळ घातली आहे. प्रत्येक राष्ट्राचा इतिहास सांगतो कीं शरीरसामर्थ्य हा एक कल्पवृक्ष आहे आणि त्याच्याच छायेखालीं राष्ट्रें वैभवोन्नतीच्या शिखरास जाऊन पोचलीं आणि त्याच्या छायेवेगळें राहण्यानें तींच राष्ट्रें रसातलास जाऊन पोचलीं. इतर सिद्धान्त काहीं ही असोत परंतु हळी तो कान पिळी ही म्हण पदोपदीं व्यवहारांत निदर्शनास येते.

शरीरसामर्थ्यावर नानाविध गोष्टी अवलंबून असतात. तैलबुद्धीचा, स्मरणशक्तीचा, व कार्यपटुत्वाचा विकास सदृढ मनुष्याच्या ठायीं जसा होतो तसा कलहीन, पंडुरोगी, व दुर्बळ मनुष्यांच्या ठायीं होत नाहीं. दांडगे, धिप्पाड व पैलवान लोक शहाणेच निघतात असे आपलें म्हणणें नाहीं परंतु नैसर्गिक बुद्धि, ग्रहणशक्ति व व्यासंगनिष्ठा हीं निरोगी शरीराच्या मनुष्यांत चांगलीं फलद्रुप पावतात. मानसिक व शारीरिक शक्ति बहुतेक आनुवंशिक व उपजत येतात. त्या शक्ति प्रगल्भतेस येऊं लागल्या म्हणजे त्या प्रत्येकीचें प्रमाण कायम राखून त्यांचा योग्य प्रकारें विकास झाला पाहिजे. एवढाच काय तो आमचें म्हणण्याचा मथितार्थ आहे. ज्या प्रकारचें बीजारोपण असेल त्या प्रकारचा वृक्ष तयार होईल. शरीरानें व मनानें सदृढ असणें फार उत्तम. मानसिक गुणसमुच्चयाला शरीर हें अधिकरण आहे आणि चांगल्या कोंदणात जसें हिऱ्याचें तेज फांकतें त्या प्रमाणें मजबूत हाडकांठिच्या माणसांची मानसिक उन्नति कांहीं लोकोत्तर असते. दुर्बळ लोक विद्वान आहेत त्याच प्रमाणें धष्टपुष्ट लोक मूर्ख ही आढळतात. तेव्हां शारीरिक आणि मानसिक शक्तींचा संयोग जन्मतः नियमित असतो परंतु तेव संमेलन नियमित प्रमाणावर कायम राखणें हें मनुष्याचें कर्तव्य होय.

देशकालवर्तमाना प्रमाणें आपल्या गरजा निरनिराळ्या होत असतात. प्राचीन काळीं मनुष्ये मजबूत हाडापेरांचीं असलीं तरच त्यांचा निभाव लागत असे. पूर्वीचे युद्धाचे, दंग्याधोप्याचे व अशांततेचे दिवस होते तेव्हां मनुष्य निरोगी असेल तर तोच जगांत वांचत असे परंतु उत्तरोत्तर शांतता, स्वस्थता व अबादानी झाली, वैद्यकी, व्यापार व रोजगार वाढले तसतशा लोकांच्या गरजा शरीरप्रकृतीच्या सदृढतेपेक्षां मानसिक सामर्थ्याच्या विशेष मासूं लागल्या. मानसिक शक्तीची वाढ एवढी जबरदस्त झाली कीं तिनें बाजारांत विद्वत्तेलाच भाव चांगला आणला तेव्हां शरीरस्वास्थ्याला झुगारून लोक विद्वान बनण्याच्या भरास लागले शरीरसंपत्ती पेक्षां मानसिक संपत्ति खरोखर अधीक मौल्यवान आहे. पैलवान गडी दुसऱ्याच्या देहावर प्रभुत्व मिळविता म्हणजे जसे चार पशु आपल्या ताब्यांत ठेवावयाचे त्याच प्रमाणें तलवार बहादुर रणशूर नरपुंगव आपल्या अंटाक्यांतील बांधवास शरणांगत करितो. परंतु ज्ञानशाली तत्ववेत्ता, धुरंधर मुत्सद्दी, अगर रमज्ञ कवी आपल्या आंगच्या मानसिक संपत्तीनें सर्व जग आपलेसें करून सोडतो. संस्कृतांत, 'विद्वान् सर्वत्र विजयी भवति' तेव्हां मानसिक उन्नतीची मातबरी फार मोठी असली तर शरीराच्या उन्नती शिवाय कोणाचा जय नीट बसत नाहीं. हा जय बसवेल तेवढा बसविणें आपल्या हातीं आहे

हिंदुस्थान देश लक्ष्मीचें माहेरघर म्हणतात परंतु त्याच्या अंगीकार हा देश समशीतोष्ण कटिबंधांत असल्या मुळें सृष्ट पदार्थांचें विलासमंदिर म्हटलें तरी चालेल. सर्व देशांत हवापाणी उत्तम व धनधान्य विपूल असल्या मुळें मनुष्याचा चरितार्थ स्वल्प श्रमांत होऊन त्याच्या मनाची प्रवृत्ति ऐष आरामाकडे जात असे हवापाण्याच्या उत्कृष्टपणानें व्यायामा शिवाय अन्न पचन होतें व खाण्या पिण्याची सुबत्ता असे. तेव्हां अशा सुखाच्या खाणींत निमग्न असलेल्या नेटिव लोकांस कशाची ही ददात नसे. परंतु कालचक्र फिरलें. आम्ही आपलें आपलें म्हणून जें मानीत होतो तें दुसऱ्याचें ठरलें, आपलेपणाचें स्वामित्व व्यास गेलें, आणि पोटाचे गुलाम, दुसऱ्याचे ताबेदार बनलो इतकेंच नाहीं तर आम्हास ताबेदारी वर ही कोणी ठेवूं इच्छित नाहीं, व आमच्या पोटापाण्याची सोय राहिली नाहीं. तेव्हां आम्हास आमच्या राज्यकर्त्यांची मनधरणी करावी लागते. राज्यकर्त्यांनीं उदारबुद्धीनें मानसिक शिक्षणाचा जो शकट चालविला आहे त्याच्या चाका खालीं आम्ही चिरडून गेलों तरी त्याची आम्हास पर्वा नाहीं. इंग्रजी विद्या संपादणें हेंच एक आयुष्यमोल कर्तव्य झालें आहे.

इंग्रजी विद्येच्या पायीं आमची शाळांतून शिकलेलीं मुलें सर्वच मृत्यूच्या दरबारांत

प्रवेश करितात असें नाहीं तरी हल्लीं मुलांच्या कडून आईबाप वगैरे वडीलधारी मंडळी विद्यार्जनासाठीं श्रम करून घेतात ते श्रम त्यांच्या शरिराच्या आरोग्यावर आघात मारतात किंवदुना तीं मुलें निःसत्व, विकल व खुंटीं निघतात त्यांच्या आयुष्याचें मातेरें होतें. इतकेच नहीं तर आमच्या पुढील पिढ्यांची मनो स्थिति काय होईल याचें अनुमान ही आह्मांस करवत नाहीं. विद्या संपादणें कांहीं वाईट नाहीं परंतु सांप्रतच्या अभ्यासक्रमाचा प्रत्यक्षजणाप सर्वज्ञ व सर्वेवदू करण्याचा उद्देश दिसतो. ग्रंथांच्या अभ्यासांत कांहीं फेरफार करावे हें आह्मी सांगू शकत नाहीं तरी आह्मास एवढें दिसतें कीं सांप्रतची शिक्षणपद्धति शरिराला घातुक व अपायकारक आहे. तेव्हां अशा शोचनीय स्थितीं मध्यें शारिर शिक्षणाचा निष्बळ हवाला मुलांवर व संपत्तिवंत त्या शिक्षणाची अभ्यासक्रमांत आवश्यक शिक्षणामध्यें गणना करण्या विषयीं कांहीजणांनीं प्रश्न काढला आहे. शिकलेल्या पुस्तकांतून विद्यार्थ्यांची परीक्षा होते त्या प्रमाणें शारिरिक शिक्षणाची परीक्षा देणें सर्वांस भाग करावयाचें आहे व्यायाम शिक्षण असें भाग होण्या पूर्वी कलकत्त्या कडील कांहीं बाबू मंडळींनीं युनिव्हरसिटीस विनंती केली आहे कीं ज्या प्रमाणें परीक्षेस बसण्याच्या लायकी साठीं अमुक दिवस शाळेंत हजिरी लागते त्याच प्रमाणें अमुक दिवस वर्षांतून तालीम न केलेला विद्यार्थी परीक्षेस घेऊं नये. ही सूचना फार उत्तम आहे. आणि ती सूचना सर्व हिंदुस्थानच्या शाळाखात्यांच्या अधिकाऱ्यानीं अवश्य लक्षांत घ्यावी असें आम्ही इच्छितों.

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER 3, 1892.

We propose giving to-day with the greatest pleasure to ourselves and we hope to the greatest interest of our readers what no one thinks or cares to think. We want to define to-day what is teaching and what is a teacher. It is possible and useful to separate teaching from the acquisition of knowledge. The subject of teaching is mind and its work the strengthening of mind and development of mental faculties. The mind in this is like the body. In the case of the body it is possible and useful to separate games and gymnastics from any exercise of strength. Only health and strength and not money result from the toil. Let then the mere acquisition of knowledge be put on one side as not belonging in the first instance to the theory of teaching any more than wages belong to the theory of training the body. For the same reason distinction must also be drawn between teaching and learning. A learner may occupy himself to do this or that work for filling in material for use. But such doings of work do not belong to teaching and mental training. Teaching means dealing with mind. Teachers are artificers of mind.

How far then is it possible to deal with the individual mind? If it be not possible there would be a dearth of true teachers. The fact on which all true teaching hinges is this, that every movement which strengthens the mind is a gain and all true teaching makes movement. Every lump burdening it is a loss and farewell hope of better things when educational authorities pay attention to the feats of memory to test the work of teachers. Teachers are a very artistic product. They do not grow like the mustard and cress. They are a combination of heart, head, artistic training and favoring circumstances. Mechanic work can be paid by the measure rule, but teaching work can not. No true teacher can produce the minds of his class as specimens on a board with a pin stuck through them like a collection of beetles.

Teaching means skilful questioning to force the mind to see, to arrange & to act. The teacher will first take care by some practical home thrusts to waken attention & compel the boy to consider why he is spending money and time at school instead of earning money as a farmer's boy in the field. To rouse the boy's curiosity as to school & its work and as to why languages & composition form as large a part of his work: no unfeeling touch can be knocked against the young heart. Liberty must not be destroyed & yet a delicate hand must teach a boy his duty to superior virtue and wisdom. Muses surely had womanly sweetness and gentle hands to endear them to the children of the early world. The love of what is true, the beautiful & the sublime is the way by which a teacher makes the mind travel through its kingdom to its throne.

So then a teacher is one who has liberty and time and heart enough & head enough to be a master in the kingdom of life; one whose delight it has been to study mind, not in books, but in the strange realities of dull and ignorant pupils; one who has found joy in darting a ray of light into dark corners and wakening up hope and interest in the sacred lesson learners who have not learnt; one who can draw out latent power from the lowest and quicken, inspirit and impart new senses to the highest. He has as his subject life and mind. His life is in living beings and not in printer's ink. He is an artificer of mind and noble life assidiously taking care not to let a single life out of those put into his hands be spoiled, or wasted, or flung aside through neglect or scorn. He is the helper and friend of the propressive weak. Yes we say weak because most boys leave schools before they are sufficiently educated to be able to think, reflect and appreciate what their teachers have done or endeavoured to do for them. For such a work the same public which owes so much to their teachers traduces them to contempt and ridicule forgetting how painful, and useful this duty is! Yet no sense can be more rankling and discouraging to a true teacher than the sense of neglect and unmerited ill-treatment from a really appreciating & just superior. No appointments or promotions by simple seniority of service when elsewhere personal qualifications are better recognised can diffuse content among the class of true teachers and good men will cease coming forward unless forced by extreme necessity to do it! To starve worthy men and to sacrifice the better to the worse in a profession so sacred and so hard to be appreciated and so ungenerously disrespected would be to strave the commissariat of an army! These reflections are, we hope, a word of counsel to all who have the power to] appreciate the most useful workers in the social order of beings.

---

Gold Standard is a hobby of the Anglo Indians but the true fealure of their proposal is eloquently expressed by the 'Hindu' of Madras and we cordially endorse the opinion and request our readers to peruse the following piece culled from the original:—

"Mr. Dadabhai objects to the Indian ryots being squeezed either to compensate Indian officials or to establish a gold standard. He is of opinion that the present trouble is solely due to the inordinate drain on India from England. In a word, the ambition of the U. C. S. men was to be as well off as the C. S. men in these respects. But the C. S. men want to be still better off and they wish not only their pension and furlough allowances but their monthly salaries also to be paid in pounds, shillings and pence. This is the real secret of the agitation. But of course envy cannot dwell in heavenly breasts and ostensibly the Indian Currency agitation is only the outcome of a laudable desire to improve the material condition of India and to make her worthy of a place among the great nations of the earth. Practically the ill-paid Indian official will in no way be affected by the adoption of a gold standard. He is not going to draw his fifty or hundred Rupees a month in gold, for the largest items of his expenditure do not reach the value of a sovereign. The labouring classes to whom even the much-depreciated silver has scarcely as yet simmered down, are not going to be affected, much less to be benefited by the adoption of a gold standard. The highest among the Indian officials—and their name is by no means legion.—and the whole contingent of Anglo-Indian Government servants alone will enjoy the fruits of the agitation headed by the Hon'ble Mr. Mackay.

Mr. Dadabhai speaks of the inordinate drain of England from India. What is this due to? It is hard to believe it, but it is largely due to the privilege which these Anglo-Indian Civilians themselves enjoy, of having their pensions paid in the superior currency of Britain. The losses on these sums by exchange fall on the Indian Exchequer. Dreams of bankruptcy hover nightly over the sleep of the Viceroy and his Finance minister. And Mr. Mackay and Co, suggest with charming simplicity that the remedy, the sole remedy, is for the Government to make its monthly payments also in gold. They propose to make the Government's Indian charges also a sort of home charges. This is an instance of curing a disease by killing the patient."

---

## वऱ्हाड

हवामान—पावसाळा संपून हिंवाळ्यास आरंभ झाला असें हल्लींच्या ऋतुमानावरून दिसतें. आठवडाभर उघाडी असून थोडथोडे थंडी हो पडतें. रब्बीचे पेरे करण्यासाठीं जमिनी तयार जलदी व्हाव्या ह्मणून शेतकामें जोरानें चालली आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

आकोल्याचे स्टेशन मास्तर रा. रा. विष्णु वसुदेव खरे हे दीड महिन्यांच्या रजेवर कोंकणांत गेल्या कारणानें त्यांच्या रजेंत रा. रा. श्रीनिवास व्यंकटेश उर्फ राजाबा यांस स्टेशन मास्तर नेमलें.

सबरजिस्ट्रारच्या परीक्षेंत ८ मोहरीर पसार झाले त्यापैकीं कळलेल्या गृहस्थांचीं नांवें:-

विठ्ठल शिवराम, रामचंद्र पांडुरंग, शंकर राघु, व्यंकटेश नारायण, त्रिम्बक रामराव, नागोराव हणुमंत, हे सहाजण व आणखी महादेव बळवंत व दुसरे एक ग्रेस पास मिळून आठजण पसार झाले.

अलिशान रेसिडेन्ट मि० ब्रौडन साहेब यांनीं आपला वऱ्हाडांत येण्याचा बेत तूर्त तहकूब केला आहे.

रा. रा. रामराव चीफ कानस्टेबल यांस सेशन कोडतानें दोन महिन्यांची सजा मिळी होती तो हायकोडता कडे केल्या अपिलांत रद्द होऊन सदहु गृहस्थ दोषमुक्त ठरले.

कर्नल मेकेंझी कमिशनर वऱ्हाड हे सर हद्दीच्या भागाकडे एका मोठ्या हुद्यावर जाणार असल्या विषयीं वैदर्भीयांस बातमी समजत.

सबरजिस्ट्रारचे दर्जा साठीं नवीन काढलेल्या परीक्षेस २१ उमेदवार असून ८ पसार झाले. गेल्या सोमवारीं ही परीक्षा व नंतर चीफ कानस्टेबलांची परीक्षा घेऊन कर्नल लेन साहेब परत उमरावतीस गेले.

येथील 'सर्वोद्योग कंपनी' नें आपली दुकानदारी बंद केली व्यापारांत एखादी ठोकर लागल्याचें आश्चर्य ठाऊक नाहीं. तेव्हां दुकानाचा पाय आंत येण्यास कारणें किंतीही व कशींहि घडगुती असलीं तरी एकंदरीनें लौकिकदृष्ट्या पांढरपेशा लोकांच्या नादानीचाच व्यवहार घडला. दुकान एखाद्या व्यापाऱ्यास विकून त्याची व्यवस्था लावणार आहेत परंतु आमच्या मतें दुकानांतील सामानाची विक्री लिलावानें केला तर त्यांत भागीदारांचा फायदा ह्मणून कोणास नांव ठेवण्यास जागा रहात नाहीं.

काल सायंकाळीं येथील लायब्ररींत रा० रा० दत्तात्रय विष्णु भागवत बी. ए. एल. एल. बी यांनीं 'देशीच कपडा वापरावा कीं काय' या विषयावर संभाषण केलें. व्याख्यानमालेतलें हें १० वें व्याख्यान आहे.

---

## नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें निम्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें. दि. कि. क्लास १९ मि. नंबर १३ १८९२

विद्यमान स्पेशल अ० कमिशनर साहेब निम्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव रंगुलाल बापाचें नांव भागचंद अगरवाले राहणार बाळापूर तालुके निम्हा अकोला यांस मयत काशीबाई जवळे तिळोकचंद अगरवाले राहणार बाळापूर तालुके व जिल्हा अकोला यांचें कर्ज वसुल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून सदहु अर्जदार यांणीं अर्ज केला आहे त्याअर्जा करितां सदहु मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे हरे कळविण्यांत येत आहे कीं तारीख १९ माहे अक्टोबर सन १८९२ इा रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २८ माहे अक्टोबर सन १८९२ इा.

V. N. Dandekar.

सीविल ज्यडज्य.

( शिक्का )

---

## वर्तमानसार.

युरोपियनचोराच्याही कल्पना वेगळ्याच अमेरिकेतल्या कांहीं चोरांनीं आगगाडींतल्या मालाची लूट करण्याचा इरादा करून रेलवेच्या रस्त्याचे एक ठिकाणचे रूळ बऱ्याच लांबपर्यंत काढून टाकले. आगगाडी नेहमीच्या रीतीनें आली पण रूळ नाग्यावर नसल्यामुळें ती जमिनींत घुसून अपघात झाला. कित्येक लोक ठारही मेले या अपघाताची ही धांदल सुरू झाली तेव्हां त्या चोरांनीं त्या धांदलींत शिरून दाहा बीस लाख रूपयांची झपाटून चोरी केली आणि आपला तळीराम गार केला. हिंदुस्थानांत रेलवे होऊन पुष्कळ मुदत झाली पण असला एकादा प्रकार झाल्याचें उदाहरण नाहीं, यावरून चोरीच्या कसबांत हिंदुस्थानचे लोक युरोपियनलोकांपेक्षां फार मागें आहेत असें होतें. हिंदुस्थानच्या लोकांनीं आपल्यांतला हा कमीपणा काढून टाकण्याच्या मात्र नादीं लागूं नये.

हिंदुस्थानचे हल्लींचे कमांडर इनचफि जनरल राबर्ट हे येत्या उन्हाळ्यांत पेन्शनर होणार व त्यांच्या मागून ड्युक आफ कनाट हे त्यांच्या जागीं होणार असें सांगतात. हिंदुस्थानच्या जुन्या शूर घराण्यांच्या तरुणांचें मिलिटरी कालेज असणें अवश्य आहे असें या ड्युक साहेबांचें ह्मणणें आहे.

चीनच्या बाजारांत हिंदुस्थानच्या कापडाची तेजी असून विलायतच्या हुंडीचा भाव वाढत चालल्यानें हिंदुस्थानच्या कापडास जास्त भाव येण्यास कारण झालें. आहे हिंदुस्थानच्या गिरण्यांनीं ही संधी साधून पुढें आपलें वजन कायम ठेवण्यासाठीं झटलें पाहिजे.

मणिपूर येथें येत्या हिवाळ्यांत एक लटकीं लढाई व्हावयाची असून बरीच फौज त्या करतां तेथें एकत्र व्हावयाची आहे. मणिपूरसारख्या सरहद्दीवरच्या जागीं असलें प्रकार होणें हें आसपासच्या परहद्दीतील लोकास दराऱ्यांत ठेवण्यांस फार हितावह आहे.

इंग्लंड व इंग्लंडच्या वसाहती यांच्या दरम्यानचा व्यापार अप्रतिबंध होणें अवश्य आहे व त्याकरितां सरकारानें, मध्यंतरींचे कर वगैरे रद्द करून व्यापार संबंधानें सर्वांचें ऐक्य करावें असा सरकारास अर्ज करावा असें न्युपोर्ट येथें व्यापारी मंडळींत ठरलें. त्यांचे विचार चांगलें आहेत, पण तसें झाल्यास मुंबईच्या गिरण्यांचा पाडाव कसा करतां येईल तसेंच हिंदुस्थानचा व्यापार बुडवून इंग्लंडच्या व्यापारास उत्तेजन कसें देतां येईल?

मासे मारणारीं कांहीं इंग्रजी गलबतें राशियन लोकांनीं पकडलीं ह्मणून त्या उभयतांत बोलाचाली सुरूं झाली आहे.

पारिस येथील घड्याळें तयार करणाऱ्या एका माणसानें २९ वर्षें मेहनत करून एक टाइमपीस तयार केलें आहे. त्या घड्याळास वेळ दाखविणाऱ्या वेगळाल्या चार डेटी असून त्या अनुक्रमें लंडन, पारीस जिनिवा व रोम येथील वेळां दाखवितात. त्याच्या घाटांचा अवाज वेगळाल्या नऊ प्रकारचा होतो आणि वेगळाले व्यापार धंदे करणारे ४२ पुतळे मोठ्या आवेशानें आपापले धंदे करीत आहेत असें आढळतें. चांभार, झाडू, खाटीक अरकशी, सांधेसांधणार, दळणारा आणि किनरीवाला असे प्रथम पुढें येऊन नंतर दुसरे ह्मणजे भाकरी भाजीत असलेल्या स्वयंपाक्यापासून तों घंटावाजविणाऱ्यापर्यंतचे सर्व लोक येतात चार नाचे एक गाणे नाचतात आणि घड्याळाच्या लोलकांच्या टिकटिक आवाजाशीं जुळतील अशीं पावलें टाकून कांहीं शिपाई फ्रेंच निशाणावरून पुढें जातात. बर्नुस शहराच्या बाजारांत असलेल्या घड्याळावर जीं चित्रें आहेत त्यापेक्षां हीं चित्रें जास्त सुबक दिसतात.

ब्राजील येथील तीन पलटणी बंड करण्यास प्रवृत्त झाल्या व त्यावरून तेहतीस आफिसरांस कैद करण्यांत आलें आहे.

इंदू नदीवरून फौज नेण्याकरतां लवकरच पूल होणार आहे.

चित्रळचा वृद्ध होतर मेला तरी त्याच्या दोघां मुलांत अजून लढाई सुरू झाली नाहीं. धाकट्यानें गादी बळकावून नाकेबंदी केल्यामुळें थोरल्या खऱ्या वारसदार मुलास आंत शिरण्यापच हरकत झाली आहे. ठा अ.

अमेरिकेंत चिकागो येथें जे सर्व जगाचे प्रदर्शन भरणार आहे त्या बरोबर एक सर्व जगांतील धर्मानुयायांचे एक पार्लमेंट भरणार आहे जपानानें आपल्या तर्फे एका प्ररूपात संस्कृत पंडितास प्रतिनिधि नेमलें आहे. संस्कृत ज्ञान, भांडारांचा महिमा वर्णन करणाऱ्या हिंदु लोकांच्या वतीनें कोण जाणार?

'डेली क्रानिकल' वर्तमानपत्र ह्मणतो:— ग्लॅडस्टोन साहेब लवकरच उन्हाळा सुरू झाल्या बरोबर आपल्या प्रधानकीच्या कामाचा राजीनामा देणार व त्याच्या जागा सर डब्ल्यू हार्ट कोर्ट अथवा अर्ल आफ रोजबरी अथवा अर्ल आफ स्पेन्सर सारखा कोणी तरी 'पीअर' सरदार येणार अशी गुणगुण उठली आहे.

मागें मागें सरणार डोंगर— युनायटेड स्टेटच्या दक्षिणेस कपारोली प्रांतांमध्यें बर्फाचा डोंगर आहे. तो दरसाल मागें मागें सरत असतो अशी दंत कथा असें परंतु त्यावर विश्वास कोणाचा नव्हता. वास्तव या गोष्टीचा शोध करण्या करितां कांहीं विद्वान लोक तेथें गेले होते. त्यांच्या अनुभवास असें आलें आहे कीं, दरसाल हा बर्फाचा डोंगर ४७ फूट मागें मागें सरत जातो. चमत्कार आहे!

न्यू फौन्डलन्डे, देशांत सेन्टजान येथें थोडे दिवसापूर्वी अग्नीनें जो प्रलय केला त्याची हकीकत ऐकूनच फार दुःख होतें. त्या शहरांत बहुतेक लांकडी घरें होतीं. एक महिना पर्यंत पाऊस मुळींच न पडतां उष्णता फार वाढली होती त्यामुळें सर्व लांकडी सामान अगदीं तप्त झालेले त्याच प्रसंगीं अग्नीनें अवकृपा केली मग काय विचारावें! १६ तास पर्यंत सर्वत्र अग्निज्वाळांचा समुद्रच बनला होता. तेथें एक मजबूद देऊळ १० लाख रुपयांनीं बांधलेलें होतें त्याची हीं राख झाली. एकंदर पांच कोट रुपयांचे नुकसान झालें १० हजार मनुष्य घरावांचून उघडीं पडलीं.

ज्यांचीं डोकें लहान असून दाढ्या मोठ्या असतात ते बहुधां अक्कलशून्य असतात असें एका मनुष्याच्या वाचण्यांत आलें त्याबरोबर त्यानें आरसा घेऊन डोक्या पेक्षां आपली दाढी मोठी आहे काय हें पहावयास लागाला व आपल्या झुमकेदार दाढीशीं डोक्यांची तुलना करून आपणास कोणी मूर्ख समजतील अशी त्यास भीतिपडली.त्यानें लागलीच डोक्यानें मानानें जितकी तितकी दाढी योग्य दिसेल तितकी मुठींत गच्च धरून दिव्याजवळ गेला आणि बाकीची दाढी दिव्यावर धरली! बोलून चालून केस तें त्यांनीं तेव्हांच पेट घेतला. दाढीवाल्या बुवानें हात काढून घेतल्या बरोबर भाडकन दाढी जळून खांक झाली आणि बुवा लागले हनवटी चोळायला! गरीब बापड्याला पुस्तकांतील वाक्याचा किती तरी लवकर अनुभव आला बरें? न्या. सिं.

तुर्कस्थानांत पुष्कळच विद्यार्थ्यांना कैद करून बंदरांतील आगबोटीवर चढविण्यांत आलें आहे, तसेंच कॉन्स्टॅटिनोपल येथील पुष्कळ वर्तमानपत्रवाल्यांसही धरिलें आहे याचें कारण अद्यापि बाहेर आलें नाहीं.

आपलें सरकार पैशाच्या पंचाईतींत असल्यामुळें बाहेरून येणाऱ्या कापडावर व सुतावर जकात बसविणार व त्या बरोबरच आमच्या गिरण्यांतल्या व हातमागांवरच्या कापडावर व सुतावर कर बसविणार आहे, असें ह्मणतात.

पुण्याचा गायनसमाज शिकागोस एक गायकमंडळी पाठविणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

बृहस्पती गृहाला एकंदर पांच उपगृह अथवा चंद्र आहेत, असें एक ज्योतिष ह्मणतो.

मि. रुद्र, बॅरिस्टर, यांनीं निजाम सरकारच्या कोर्टा संबंधीं जी नुकतीच विरुद्ध टीका केली होती, तिजबद्दल क्षमा मागितल्या वरून त्यांना तिकडील कोर्टांतून पुन्हा खटले चालविण्याची परवानगी मिळाली. सु० प०


## जाहिरात

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुस्त्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विकीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्यालपुपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं व त्यांनीं विकी करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून कि. १॥ रु.

३ धातुगत ज्वर ह्मणजे चवथारे हिव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. कि. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १८५ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोड्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा कि. १ पुड्यास ८१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा कि. १ डबीस १॥ रु.

६ बीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास कि. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस कि. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शूळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस कि. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं न सून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल कि. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस कि. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेल ह्मावर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस कि १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशा याजवर दर डबीस कि. १८=

१३ हागवण व अतिसार १ डबीस कि. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस कि: १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस कि. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्मावर १ डबीस कि. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ६० गोळ्याच्या डबीस कि. १८—

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस कि. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस कि. ॥। हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस कि. १॥ रु. ही २ मुळें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमाक्षिनीविसंत खात्रीचा १ तोळ्यास कि. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस कि. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फुल वदस रातांधळें लाली खपरी चुळ चीपडे गळती यावर १ डबीस कि. १८६

ह्या शिवाय पोटेंज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेश मागवून विकी करील त्यांनीं विकी करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य कुरणखेडकर अकोला गंगावरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.


☞ हें पत्र आकोलें येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ८।३
साहामाही ,, ३ ,, ८८
सालअखेर ,, ७ ,, १८८
किरकोळ अंकास .....८४

Rs.
Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears] 7 ,,1Rs· 8 a
Six monthly.....3 ,, 8 as
Single copy.....4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८।८६
दुसरे खेपेस .....८।

Advertisemen
Below 10 lines...2R
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 10 OCTOBER 1892 NO 40

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख १० माहे आक्टोबर सन १८९२ इ० अंक ४०

डा० वामन गोपाळ याचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संबी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग जसे सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें तऱ्फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें वकच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास या सारखें दुसरे औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फाफरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुस्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जतंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुंचा शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचें एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून किती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करज्य व पिंगट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोष्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

## बरार रूरल लॉ.
## नियम.

(३७ वे अंका वरून पुढें चालू)

(४) कामांची किंवा खरेदीचो अंशतः मंजुरी देण्याची मनाई.:—

मागील फिकऱ्यांत सांगितलेले मंजुरीचे अधिकार असे प्रकारें चालवूं नयेत कीं, तेणें करून एखादें काम तुकड्या तुकड्यांनीं मंजूर करितां येईल किंवा ज्या जिनसांची एकाच इस्टिमेटांत तजवीज होण्याची होती त्या निरनिराळ्या वेळीं विकत घेतां येतील.

(५) लोकल फंड पब्लीक कामास पब्लीक वर्क्स खात्याचा कायदा कितपत लागूं :—

या नियमांत विशेषें करून जितकें सांगितलें आहे तितकें खेरीज करून सर्व लोकल फंड पब्लिक कामास हिंदुस्थान सरकारचा पब्लीक वर्क्स खात्याच्या नियमांचा कायदा होऊं शकेल तितका लागूं पडेल.

(३)—रकम (ह) अन्वयें नियम.—हिशोब ठेवण्यासंबंधीं व हिशोब तपासणारांच्या नेमणुकी व पगारासंबंधीं.

७. एखादे जिल्हा बोर्ड नेमलें गेल्यावर ज्या दिवशीं तें स्थापन झालें त्या दिवशीं कायद्याचें कलम २२ यांत सांगितलेल्या हरएक फंडाच्या शिलका सरकारी खजिन्यांत त्या बोर्डाच्या नांवें जमा केल्या जातील व त्याच वेळीं त्या रकमा बोर्डाच्या पास बुकांत दाखल केल्या जातील.

८. जिल्हा फंडांत देण्याच्या ठोक पैशाचा हिशोब. प्रत्येक सालच्या जूनच्या १५ व्या तारखेस किंवा त्या पूर्वी डेपुटी कमिशनरनीं ह्या नियमास जोडलेल्या परिशिष्ट १ प्रमाणें गेलेल्या मार्च महिन्याच्या ३१ तारखेस संपणाऱ्या सरकारी सालीं कलम २२ पोट कलम (१) रकमा ब. क. ड. इ. फ. व के. अन्वयें जिल्ह्याचे फंडांत दाखल केलेल्या निवळ पैशाचा हिशोब जिल्हा बोर्डाकडे पाठवावा. हा हिशोब कंट्रोलरशी पत्रव्यवहार करून तयार केला पाहिजे व कंट्रोलरनीं ज्या सालांत वसूल आलेला आहे त्या सालच्या हिशोबांत फंडाकडे देणें असलेल्या रकमांचा जिल्हा फंडाच्या नांवें वर्ग करावा. सदहू रकमांत सांगितलेला पैसा जिल्हा बोर्डानें वसूल करूं नये.

९ वसुलाची व्यवस्था कशी करणें.—

जिल्हा किंवा तालुक बोर्डानें वसूल केलेल्या सर्व रकमा दररोज सरकारी खजिन्यांत भरणा केल्या पाहिजेत. भरणा करण्या पूर्वी अशा वसुलाचा कोणताही भाग कोणत्याही कारणा वरून खर्चा करितां घेता येत नाहीं. सर्व वसुलाबद्दल बोर्डानें सरकारी सालाकारितां अनुक्रम नंबर दिलेले काउंटर फाईल नमुन्याप्रमाणें पावती द्यावी. व ते वसूल खजिन्यांत भरणा करते वेळी त्याजबरोबर पास बुक व चलान पाठविली पाहिजे, व त्यांत प्रत्येक वसुलाचा बरोबर प्रकार दाखविला पाहिजे. खजिन्यांत केलेला भरणा कपाश नकांत जमा धरूं नये परंतु ज्या चलानीं बरोबर पैसा खजिन्यांत रवाना केला असेल तिचा दाखला कपाश बुकाच्या तिसऱ्या कोष्टकांत जमेचे बाजूकडे काळजी पूर्वक द्यावा.

१० जिल्हा व तालुक बोर्डाचा वसूल खजिन्यांत भरणा केल्याबद्दल पावती.—

खजिन्यांत भरणा केलेल्या प्रत्येक रकमे बद्दल ट्रेझरी किंवा सबट्रेझरी आफिसरानें लहान सही करून पास बुकांत पावती द्यावी बोर्डाच्या कचेरींत पास बुकांत रकम दाखल करूं नये किंवा बदल अगर दुरुस्ती करूं नये. तसें करणें जरूर वाटल्यास बोर्डाच्या सांगण्यावरून ट्रेझरी आफिसरानें तसें करावें. सबट्रेझरींत केलेला भरणा व तेथून दिलेला पैसा हा देखील डिस्ट्रिक्ट ट्रेझरी आफिसरानें जिल्हा बोर्डाच्या पास बुकांत दाखल करावा. परंतु तो पासबुकांत दाखल केला जाई पर्यंत जिल्हा बोर्डाच्या हिशोबांत दाखल करूं नये.

११ बिलाची व्यवस्था कशी करणें.

प्रत्येक बिलावर "चेक नंबर तारीख देऊन आदा केले" असा शेरा लिहावा. खर्चाचा प्रकार चेकावर स्पष्टपणें लिहिला पाहिजे.

झालेल्या कामाच्या किंवा सामान खरेदीच्या खर्चाच्या बिलाबरोबर घेतलेल्या मापाचा किंवा मजुरांचा किंवा पुरविलेल्या सामानाच्या वजन किंवा संख्या वगैरेच्या तपशिलाचा दाखला असला पाहिजे. ह्या प्रमाणें तपासणी केली व खर्च बरोबर आहे अशा बद्दल कामाकरितां जबाबदार असलेल्याचा इसमाचा दाखलाही पाठविला पाहिजे.

१२ चेक बुकें ताब्यांत ठेवणें.

चेक बुकें जो डिपुटी कमिशनरचे मार्फतीनें कंट्रोलर हैद्राबाद यांजकडून पुरविली जातील तो चेअरमन यानीं आपलें स्वतःचे ताब्यांत कुलुप किल्लींत ठेवावी. व चेअरमनचे जागीं जेव्हां दुसरा इसम नेमण्यांत येईल तेव्हां उपयोग न केलेले चेकांचे संख्येबद्दल रीती प्रमाणें पावती घेतली जावी.

१३ खात्याचा पगार व कंटिंजेंट बिलें कोणीं तयार करावी.

मेडिकल (वैद्यको) व एज्युकेशनल (शाळा) खात्याचा पगार व कंटिंजेंट बिल अनुक्रमें सिव्हिल सरजन व शाळाचे डिपुटी इन्स्पेक्टर यांणीं सरकारी नौकरींतील असे नौकरांबद्दल जो नमुना दिला असेल त्या नमुन्या प्रमाणें तयार करावीं व तीं जिल्हा बोर्डाकडे पाठवावीं. इतर नौकरांचे पगार व त्यांचीं कंटिंजेंट बिलें डिपुटी कमिशनरचे आफिसांत, किंवा खात्याचें मुख्य हे बोर्डास विचारून जसा हुकूम देतील त्या प्रमाणें खात्याचे इतर अधिकऱ्यांनीं तयार करावी.

बिलें तपासल्यावर चेअरमन किंवा त्यांचे गैर हजरींत व्हाइस चेअरमननें आदा करण्याकरितां मंजूर करावीं. व त्या रकमेकरितां चेक द्यावा. (पहा नियम ४) बिलें माहेवारी हिशोबा बरोबर कंट्रोलरचे आफिसांत पाठविण्याकरितां ठेऊन द्यावीं.

१४ जिल्हा व तालुका बोर्डाचे व डेपुटी कमिशनरच्या कचेरींत हिशोबांचीं रजिस्टरें ठेवणें.

जिल्हा व तालुक बोर्डानीं अनुक्रमें व डेपुटी कमिशनरच्या कचेरींत खालीं सांगितलेलीं हिशोबांचीं रजिस्टरें ठेवावीं.

(१) जिल्हा व तालुका बोर्डानें.

१ कपाश बुक (वसूल व खर्चाबद्दल) नमुना नंबर २.

२ चेकांचें रजिस्टर नमुना नंबर ३.

३ पास बुक नमुना ४

तसेच टरीब मागणी किंवा सारा, आडव्हानसेस व बिल बुक बद्दल जशी जरूरी लागेल त्या प्रमाणें जास्त रजिस्टरें ठेवावीं.

डिपुटी कमिशनरचे आफिसांत.

१ वसुलाचें कपाश आबस्ट्रॉक्ट बुक नमुना नंबर ५

२ खर्चाचे कपाश आबस्ट्रॉक्ट बुक नमुना नंबर ६

३ माहेवारी शिलकी पत्रक ७

४ वसुलाचा माहेवारी वर्गवारी गोषवारा नं० नं० ८

५. खर्चाचा माहेवारी वर्गवारी गोषवारा नं० नं० ९.

६. वार्षिक हिशोब नं० नं० १०

१५. कपाश बुक. दररोज लिहित जाणें. रकमाचे वर्गवारीचे संबंधानें डिपुटी कमिशनरचे कचेरींत पूर्ण होणें.:—

कपाश बुक हें जिल्हा बोर्डाचे कचेरीचा मुख्य कागद आहे त्यावरून त्याचे सर्व हिशोब तयार केले जातात. यास्तव त्यास अति महत्वाचा कागद समजला पाहिजे. जसजशी देववेव होईल तसतशी बरोबर रीतीनें व पूर्ण तपशीलवार रीतीनें रोजचे रोज त्यांत लिहित जावी. जमेकडील डावेरचे कोष्टक कोरें ठेऊन डिपुटी कमिशनरचे कचेरींतून माहिती आल्यावर लिहावें.

खोडाखोडीची परवानगी नाहीं.:—

कपाश बुकांत खोडाखोडी करूं नये. चुकीची दुरुस्ती करणें झाल्यास त्याजवर काट मारून लाल शाईनें आंकडे दुरुस्त करावें व त्याजवर चेअरमन यांणीं लहान सही करावी. कपाश बुक दररोज बंद करीत जावें.

ट्रेझरी आफिसरानें पास बुकांत वाढविलेलीं जमा व खर्च जागलींच जिल्हा बोर्डाचे कपाश बुकांत घेतल्या पाहिजेत.:—

१६. पट्ट्याचें वार्षिक नक्की उत्पन्नाबद्दल (नियम ८) अगर सब ट्रेझरीतील वसुला बद्दल (नियम १०, अगर जेव्हां ट्रेझरी आफिसरानें लिल्हा बोर्डाचे नांवावर असलेली जमा बोर्डाचे पास बुकांत वाढविली असेल किंवा जेव्हां सबट्रेझऱ्यांतून दिलेला पैसा (नियम ३) पास बुकांत दाखल केला असेल तेव्हां त्या रकमा लिल्हा बोर्डाचे कयाश बुकांत दाखल केल्या पाहिजेत म्हणजे तेणेंकरून पास बुकांत दाखल केल्या प्रमाणें डिस्त्रिक्ट फंडाची जमा व खर्च यांच्यांत व कयाश बुकांत दाखल केलेल्या रकमांत पूर्ण मेळ राहील.

१७. पास बुक बोर्डानें महिन्याचे अखेरचे कामाचे दिवशीं पुरें केलें जाण्याकरितां खजिन्यांत पाठविणें. ट्रेझरी आफिसरानें दर महिन्यास बंद करणें.

नियम ९ यांत पूर्वी सांगितल्याप्रमाणें खजिन्यांत पैसा भरणा करते वेळीं पास बुक त्या समागमें पाठविलें पाहिजे तसेंच तें प्रत्येक महिन्याचे कामाचे अखेर दिवशीं लिहिलें जाण्याकरितां व रीतीप्रमाणें बंद केलें जाण्याकरितां खजिन्यांत पाठविलें पाहिजे. त्यांत दाखल केलेल्या रकमांची बेरीज घेतली जाईल, व शिलक काढली जाईल व ट्रेझरी आफिसरानें आपले सहीचा दाखला द्यावा कीं फंडाची एकंदर जमा व खर्च खजिन्यांतील हिशोबांत दाखल केलेल्या रकमांशीं मिळतो.

बोर्डानें पास बुक व कयाश बुकांचे शिलकेचा मेळ घेणें व कयाश बुकांत दाखला देणे. पास बुकांत काढलेली शिलक कयाश बुकाचे शिलकेशीं जरूर मिळाली पाहिजे.

ह्या दोन्ही शिलकांत मेळ मिळाला ह्या गोष्टीबद्दल चेअरमन यांणीं आपल्या सहीनें कयाश बुकाचे पानावर (लाल शाईनें) दाखला दिला पाहिजे तो असा कीं, "दाखला देण्यांत येतो कीं पासबुकाप्रमाणेंचे अखेर दिवसाची शिलक कयाश बुकांत त्याच तारखेस दाखविलेले शिलकेशीं मिळते."

मिती अश्विन वद्य ९ शके १८१४

## फौजदारी न्यायखातें

(सन १८९१ चा रिपोर्ट)

सन १८९१ सालचा वऱ्हाड प्रांतांतील फौजदारी न्यायखात्याचा रिपोर्ट मि. आर. आर्बड साहेबांनीं रजेवर जाण्यापूर्वी लिहून ठेविला होता आणि तो तसाच नवे जुडिशियल कमिशनर मि० बुलक साहेबांनीं आलिशान रेसिडेंट साहेबाकडे रवाना केला. या रिपोर्टीचा एक प्रत मामूल नियमा प्रमाणें आह्माकडे आली आहे तिचा आह्मीं आभारपूर्वक स्वीकार करून रिपोर्टांतील ठळक ठळक गोष्टी मराठी वाचकासाठीं खालीं देतों.

सर्व वऱ्हाड प्रांतांत एकंदर १८९१ अखेरीस ७१ मानिस्ट्रेट होते त्यांत ६ लिल्हे मानिस्ट्रेट, २० पहिले वर्ग, १८ दुसरे वर्ग, १० तिसरे वर्ग, १५ स्पेशल मानिस्ट्रेट व २ बेंच मानिस्ट्रेट असे होते.

रिपोर्टीच्या वर्षीं एकंदर १८७२४ अपराध सरकारच्या दप्तरावर घेतले गेले. त्या पैकीं ३०९४ फिर्यादी मानिस्ट्रेटांनीं पुरेसा पुरावा नसल्यामुळें काढून टाकल्या आणि ९७८ खटले बनावट व खोटे तयार केल्या विषयीं दिसल्या वरून ते ही रद्द करण्यांत आले तेव्हां बाकी शिल्लक राहिलेल्या १४६१२ प्रकरणांची गणना पुढील चौकशी साठीं ठेवलेल्या प्रकरणांत झाली आणि या मधून १२३०६ खटल्यांचा निकाल १८९१ त लागला.

सन १८९० पेक्षां ६३६ अपराध दप्तरीं-अधीक दाखल झाले. अपराधांची संख्या वाढली तरी ही वाढ प्रांताच्या मानानें व त्याच्या वसामोडीच्या मानानें फारशी लक्ष्यांत घेण्यासारखी नाहीं असा आफिशिएटींग जुडिशियल कमिशनरांचा अभिप्राय पडतो. पांच सहाशे अपराध नेहमीं कमजास्त होत असतात. १८९० त अगोदरच १०१३ अपराध त्याच्या मागील सालापेक्षां कमी होते तेव्हां यंदा ६३६ वाढले म्हणजे खरोखर संख्या मोठीशी वाढली असें दिसत नाहीं. बुलढाणा, उमरावती, व इलिचपूर लिल्ह्यांत गुदस्तसालीं अपराध कमी दाखविल्यांत आले होते परंतु १८९१ त पुन्हां अपराधांचें प्रमाण वाढलें आहे. बाशिम लिल्ह्यांत अपराध ज्यास्ती होते ते यंदा उतरले आहेत. फक्त वणी लिल्ह्यांत गेल्या दोन्ही वर्षांत अपराध वाढत आहेत.

गेल्या पंचवीस वर्षापूर्वीचा म्हणजे उदाहरणार्थ १८७४ चा रिपोर्ट चाळून पाहिला म्हणजे आढळून येईल कीं १८७४ त १३, ३३८ खटले सरकारी दप्तरीं नमूद झाले होते. गेल्या पंचवीस वर्षांत पांच हजारावर अपराध वाढले म्हणजे उत्तरोत्तर सुधारणे बरोबर अपराधांचें पाऊलहो पुढें पडत आहे असें दिसतें. लोकसंख्या वाढली, अपराध अधीकाधिक पत्त्यांत येऊं लागले, व पिनलकोडची व्याप्ति मनुष्यांच्या व्यवहारावर अधीक जोरदार रीतीनें होत गेली, या गोष्टी लक्ष्यांत आणल्या म्हणजे अपराधांचो संख्या वाढत्या कलेवर असली पाहिजे असें वाटेल; परंतु उलटपक्षीं त्या वेळचे दंग्याधोप्पाचे दिवस, लष्करी अंमल; व सामान्य जोरजुलुमाचो राहटी या गोष्टी पाहिल्या म्हणजे अपराधांचें प्रमाण शांततेच्या, पद्धतशीर न्यायदरबारच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या राज्यकारभाराबरोबर उतरलें पाहिजे असेंही म्हणणें भाग आहे. सारांश, सांप्रत अपराधांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे हें चांगल्या स्थितीचें दर्शक नाहीं. या वाढीचें कारण कांहीं विद्वान अनुभवी, व इतिहासज्ञ लोक असें दाखवितात कीं चांगल्या राज्यपद्धतीनें लोकांचे कल बदलले म्हणजे त्यांचा स्वाभाविक मनोधर्म अन्यायाच्या व गैरकायदा वर्तनाकडे अगर अपराध करण्याकडे कमी धांवतो हें खरें तत्रापि हल्लीं लोकांची देना फार वाढली आहे, आणि त्यांच्या पोटापाण्याच्या सोयी उरल्या नाहींत म्हणून स्वसंरक्षण हा जो सृष्टिधर्म त्यालाच अनुसरून मनुष्य आत्मसंरक्षणार्थ हवी ती गोष्ट करण्यास तत्पर होत असतो याच तत्वाचा प्रत्यय आपणांस अपराधांच्या वाढीनें साक्षात् येत आहे. हें मत खरें ठरलें. आणि तें खोटें असावें असें आह्मांस विदित कारणा वरून वाटत नाहीं— तर आमच्या राज्यकर्त्यांवर हलू हलू नवी एक भक्कम व जबरदस्त अशी जबाबदारी येऊं पहात आहे व ती अशी कीं राज्यकर्त्यांनीं प्रजेचा निदान उदरनिर्वाह चालेल अशा रितीचे नवे धंदेशिक्षण चालूं केलें पाहिजे, राज्यकारभाराचा खर्च कमी करून कराचा बोजा कमी केला पाहिजे, आणि स्वराज्याच्या चिरस्थाईपणा साठीं आपमतलब बाजुस ठेऊन प्रजेचे योग्य हक्क प्रजेला दिले पाहिजेत.

संवत १९४७ चा धुळें येथील पांजरपोळाचा वार्षिक रिपोर्ट त्यांच्या व्यवस्थापकांकडून आह्माकडे आला आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. रिपोर्ट गुजराथी भाषेंत लिहिला असून धुळ्याच्या 'आर्यतवृत्त' छापखान्यांत छापला आहे या पांजरपोळाचा जमाफंड रुपये २८२०९ ८ आ० २ पै आहे. १९४८ सवंत्सराबद्दल जमेचा आंदाज ७६५० रुपये असून खर्च ७९०० रुपये होईल असें अनुमान आहे. पांजरपोळांत गाई, म्हशी, बैंडे, खबुतरें वगैरे मिळून ४४५ प्राणी शिल्लक आहेत. या संस्थेचा उपयोग मोठा आहे. तिची व्यवस्था पद्धतशीर असली व लोकांचा उदार आश्रय असला म्हणजे तिची खरी मातबरी कळून येते. सदर्हु पांजरपोळाचा रिपोर्ट गुजराथींत आहे यावरून गुजराथी व्यापारी व कामदार लोक या पांजरपोळाचे पुढारी व मुख्य चालक आहेत असें सहजीं समजेल. कांहीं महाराष्ट्रीय व पारशी गृहस्थ व्यवस्थापकमंडळांत आहेत तरी फंडाचो ठोंकळ जमा व बगैरणी वगैरील गुजराथी लोकांकडूनच आलेली आहे म्हणून त्या लोकांच्या दातृत्व गुणाची आह्मी विशेष तारीफ करितों.

या पांजरपोळाची सुव्यवस्था वर्णनीय आहे. कलेक्टरापासून सर्वजणांनीं त्याबद्दल प्रशंसाच केली असल्याचें आढळतें. पांजरपोळा सारख्या संस्था लोकाश्रयाच्या, उदारपणाच्या व भूतदयेच्या तत्वावर चालतात आणि हें तत्व धुळ्यास अनेक लोकांनीं स्वीकारलें आहे हें कळविण्यास मोठा संतोष वाटतो. आमच्या अकोल्यास किंवहुना वऱ्हाडांतील बहुतस्थळीं गोरक्षणी सभा निघाल्या आहेत ही ही गोष्ट आरंभीं आनंददायक वाटेल परंतु ह्या संस्थांचे फंड व व्यवस्था हीं लक्ष्यांत आणलीं म्हणजे म्हणण्यासारखी संतोषकारक स्थिती बहुतेक गोरक्षणी सभांची नाहीं असें दिसेल. ही दीनावस्था अकोल्या सारख्या शहरीं विशेष प्रकारें दृष्टीस पडते. खरोखर प्रकार असा आहे कीं गोरक्षणी सभा म्हणजे एकादोघा व्यक्तींची संस्था नव्हे. लोकांची धर्मबुद्धि जागृत असून तदनुरूप वर्तण्याचें सच्छील लोकांचें असलें तरच गोरक्षणी सभेला योग्य स्वरूप प्राप्त होतें. नाहींतर, सेक्रेटरींनीं सभा भरवाव्या व एखादे दिवशीं वर्षांतून पोळ्याच्या सणा प्रमाणें गोमातेचें प्रदर्शन विजयध्वजासहित करावें अशी तांत्रिक पद्धत अलिकडे प्रचारांत आहे आणि त्याच प्रमाणें येथील गोरक्षणी सभेचा गेला वार्षिक समारंभ आटपण्यांत आला. प्रसंगवशात् धुळ्याच्या पांजरपोळाची सुव्यवस्था प्रसिद्ध करण्याचा योग आला म्हणून आह्मी आमच्या अकोल्याच्या गोरक्षणी सभेस या पांजरपोळाचा कित्ता गिरविण्याचें सूचवून तिची रजा घेतों.

कैलासवासी वामन शिवराम आपटे एम. ए. यांचें संक्षिप्त चरित्र गेल्या 'महाराष्ट्र कोकिला' च्या अकांत देऊन त्या अंकाबरोबर त्यांचे फोटोवरून काढलेलें चित्रही सादर केलें आहे. चरित्र थोडक्यांत बरें उतरलें आहे. भाषा सरळ, सुबोध व चटकदार आहे. पण वामनरावजी वारले त्यावेळी 'ज्ञानप्रकाशां'त व इतर कांहीं वर्तमानपत्रांत त्यांचे चरित्र प्रसिद्ध झालें आहे तें या पेक्षां खुलासेवार, वर्णनपर, बोधप्रद असें आहे. चरित्राच्या दृष्टीनें 'महाराष्ट्र कोकिला'नें वामनरावजींचो वर्तणूक, आचारविचार, व सद्गुण या विषयीं चांगली सविस्तर हकीकत दिली असतां तर ठीक होतें. वामनरावजींचें एकादे ठळक व दृश्य स्मारक असावें म्हणून खटपट चालली आहे परंतु त्यांत ह्मणण्या सारखें अद्याप यश नाहीं. महाराष्ट्रांतील दुसरी नररत्नें व विद्वज्जनि हरपले तेव्हां ही त्यांच्या स्मारकांची उभारणी बरोबर प्रमाणें अस्ताम पोंचल्यांत जमा होतें असा आमचा अनुभव आह. अगोदर थोरपुरुषांचें गुण घेण्याचा धडा फार थोडे लोक शिकलेले असतात तेव्हां स्मारकांच्या मनले पर्यंतची पूज्यबुद्धि कोठून असणार! एखादा लाट साहेब, राजपुत्र अगर युरोपियन अधिकारी असला म्हणजे त्यांचे पुतळे व स्मारकें यांनां हवे तेवढें पंड मिळतात 'गुणलुब्धाः स्वयमेव संपदः' असें कवी लिहितात परंतु या उक्तीची विपर्यासानें आह्मास प्रचिती येते.

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER

10, 1892.

As regards the stamp revenue of Berar for 1891-92 the year seems to be financially a good one. The total receipts are Rs. 782889-8-1. Deducting from this the departmental charges which are less than 7 per. cent of the total income we find the net revenue to be Rs.730357-9-6. There was a complaint last year about a decrease of nearly Rs. 13000 in net proceeds of 1890—91. The year under report has made up the loss and has more than regained the abnormal standard of revenue of 1889-90. We are not sure of the stability of this stamp-revenue which is the largest that we have ever realized. But it is a general presumption that there is no reason why the stamp-revenue should fall back from its normal receipts. Fluctuations there will be but they will range about the average income of the last three years. We quite agreed with Mr. Plowden when he pointed out last year that good or bad crops will not affect the stamp revenue in a serious degree. The satisfactory state of crops or otherwise will equally necessitate those public dealings which come within the reach of the Stamp -act Unless a better and more convincing argument comes forth to explain the rise and fall in the yield of the stamp-deparment, we are inclined to take up provisionally the explanationf as regards the variations in sale of

general stamps, which has been put forth by the Collector of Akola. The cause of increase is the normal development of business and of transactions in the ordinary course of material progress. The same cause may account, *mutatis mutandis* for any falling-off in the stamp-sale. It is not probable within the view of the present circumstances that any special unobserved causes may present themselves so as to check and retard the general current of daily transactions.

Colonel Lane has a good deal to say on the sale of 1 anna Receipt—stamp. He has pointed out that the rules of the stamp law are not dully enforced in regard to receipts for ear nest money endorsed on sattas. He observes:—'In the month of April, I addressed the collectors of Amraoti and Akola enquiring with reference to the instructions issued whether the law was being observed. After considerable delay, the collectors replied that it was not the practice to affix stamps to these receipts in their districts. Neither officer seems to have realized his responsibility to safe-guard the interest of Government in the matter. I estimate the amount of revenue derivable from this source at not less than from Rs. 2,000 to Rs. 3,000 per annum. I have seen sattas transferred from 10 to 15 times. On each occasion of transfer, a one-anna stamp was due as each transferrer acknowledged receipt of earnest money from the transferee. The matter has been specially brought again to Commissioner's notice with a view to measures being taken to put a stop to the studied evasion of the law which has been allowed.' We hope that the next report will have no complaint relating to the Satta—affairs because there will be plenty of time and means to let the Satta—merchents know that the exemption from the stamp—duty does not legalize the receipts of earnest moneys not dully stamped. In the year 1890—91, Colonel Lane observed the iniquity and injustice of the exemption from the stamp duty of the speculative sattas of a pure gambling nature, while the Laoni—Sattas are subject to Stamp duty and are *bona fide* contracts. Sir Dennis FitzPatrick was prepared to admit any proposal to levy a cess on the *Sahi*-Sattas. We find no mention in the present report of any move by way of a proposal and are therefore prompted to think that Colonel Lane had either dropped the matter altogether or has accepted Mr. Plowden's explanation that the want of attestation on the Satta—deed was the cause of its exemption from the Stamp duty. We raised, last year, the question whether Satta trade should not be abolished altogether. The Resident's view was that a Satta was a wagering affair and was therefore liable to taxation. We joined issue with him by pointing out the injustice of raising revenue from wagering contracts. But we were so far in the woing as we styled the *Sahi* Sattas as a pure affair of wagering. A recent decision of the Bombay High Court holds up Sattas as legal and justifiable contracts. The learned Judge remarked that a Satta, however of a gambling nature, must be either a right contract or nothing at all, and decided that it was a right contract. We are, therefore, obliged to point out the utter want of any tenable objection against the Satta trade.

There are two items in the stamp revenue. One is realized under the Indian stamp act. The other comes under the Court fees act including copying sheets. This branch of revenue varies with the rise and fall of the work turned out by Judicial courts. Litigation shows a fast increase, and we have, therefore, no apprehension of any deficit in the receipts under the Court fees acts. We have in Colonel Lane an able and far seeing officer to watch the interest of the Government in its financial details and would cordially echo the Resident's obligations to him for the efficient manner in which he has supervised the working of the stamp department.

---

The educataional policy of the Government is less flattering to the old traditions and solid wisdom of the past years. The first duty of a Government is to teach the people and a large percentage of its finances ought to go to defray education—expenses. In India education was for a time the beginning and forerunner of the blessings of the English rule but now education is more or less looked upon as a work of charity. The adequate measures to meet the wants of the ignorant masses entail a deal of expense and the Government is unwilling to perform its duty because it is in a financial fix. Finance is no doubt what constitutes a state but the question how to make both the ends meet is not to be solved by cutting down the limited items of the educational department which opens to men their mainstay and the ways of livelihood. The Government may be hopelessly in debts but the educational expenses are of such prime importance and inevitable necessity that they must be continued till the bankruptcy and collapse of the national exchequer.

The Government is rather averse to spend money on education either primary, middle or high. It vetoes the College grants & abolishes High—Schools with the proud pretence of getting in bodies agencies to work and the dignified boast of spending the saved funds on primary education. But the bold pretence & the loud boast are empty sounds because under the present circumstances high enucation neglected equally with the primary one. We make bold to call upon Government to justify their measures in comparison with the wise policy of other nations. In England primary education is almost free & compulsory while in India its claims are not yet properly recognized. The Government shifts the burden from its own shoulders and saddles the municipal and other local bodies with new and rising expenses with only stingy & miserly funds at their disposal. The Bombay Gazette has not fully signified his assent to such views as above but has reechoed by way of information what the Indian Spectator has said upon the subject. The abridged para from the daily is worth repetition and perusal a second time and we beg to quote it below:—

"The whole question of education and the duty of Government in regard to it, says the *Indian Spectator*, are matters admitting of no easy solution. Are the products of our University education doing what they can to impart to their less favoured countrymen the light they have had the good fortune to receive? Has the Government's assistance to higher education answered its purposes, the chief among them being the percolation of Western culture to the lower strata of Indian society? If the answer to these questions is disappointing, as it generally is, is it wise policy for Government to deny help to primary education in what has turned out to be the vain hope of educated Indians doing for their ignorant countrymen what is necessary to remove their stark ignorance? If our educated men are not prepared to take the education of the masses into their hands, Government surely must. That is how Government reason in this matter and order the transfer of their aid from higher to primary education. But there is another aspect of the question. Are Government justified in retracing their steps from high education when private effort in that field is yet but insignificant? In point of fact, the result of the present educational policy is that high education is starved without primary education being provided for. Government retire from the sphere of higher education in the hope of seeing their place occupied by private agencies, but private agencies are not forthcoming to satisfy reasonable expectations. Thus very little is done to improve the intellectual condition of the masses and proportionately much to hamper the progress of liberal education."

Our province has not arrived at this stage of the question of the duties of the Government but is on the verge of a transition of policy similar to the one above described and we hope therefore that people will be all eyes and ears to watch the progress of education in Berar while its funds are gradually dwindling to a lower and lower minimum.

## वऱ्हाड

हवामान— हस्त नक्षत्राचा एक पाऊस पडला असता तर पिकावरील रोगराई झडून गेली असती व रब्बीच्या पेरणीला फायदा झाला असता. दिवसास प्रखर ऊन पडून रात्री अमृतमय शुभ्र चांदणें पडतें सकाळीं चांगली गुलाबी थंडी पडूं लागली आहे. गांवांत तुरळक हिंव ताप व पडसेखोकला या शिवाय विशेष रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

---

सिविल आणि सेशन कोर्टीचे कायमचे ज्जार्क आफ धि कोर्ट रा. रा. बळवंत राजाराम कावळे यांस मे० जुडीशिअल कमिशनरचे आ० ज्जार्क आफ धि कोर्ट नेमल्या वरून रा. रा. त्र्यंबक गणेश परांजपे यांस मुर्तीजापूर येथें कायमचे थर्ड ग्रेड तहसिलदार नेमलें व तेथील तहशिलदार रा. रा. कृष्णाजी अंत यांस पुन्हा ह्या जिल्ह्यांत बाळापूर येथें बदलले.

---

सिव्हिल आणि सेशन कोर्टीचे ज्जार्क आफ्धिकोर्टचे जागीं रा. रा. मारुती हरी यांस अ० ज्जार्क आफ धि कोर्ट नेमलें.

---

देवास ( छोटीपाती ) संस्थानचे गादीवर नुकतेच बसलेल्या तरुण राजपुत्राचे शिक्षकाचे जागीं रा. रा. गंगाधर नारायण घाटे बी. ए. यांस पोलिटीकल एजंटांनीं मागवून घेतल्या वरून ते येथील हायस्कुलचे जागेवर हक्क ठेऊन देवास कडे जात आहेत. राजश्री गंगाधर पंत स्वभावानें मोकळे, स्नेहाला चांगले आणि विद्वत्तेने मोहक असे आहेत तेव्हां त्यांच्या शिक्षणानें एक संस्थानिक कार्यनिपुण, प्रजेला कल्याणप्रद, व वर्तनानें लोकप्रिय असा निघाला तर आह्मांस मोठा संतोष वाटेल.

---

रा. रा. हणमंत कृष्ण सब—रजिस्ट्रार बाळापूर यांनीं एक वर्षाची फर्लो रजा घेतल्या कारणानें त्यांच्या जागीं रा. रा. विठ्ठल शिवराम यांस अकोल्याहून धाडलें.

अकोला हायस्कुलांतून यंदा मुंबईच्या म्याट्रीक्युलेशन परीक्षेस बारा विद्यार्थी धाडण्यांत आले.

---

आह्मास लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं येथील डिपुटी कमिशनरचे ज्जार्क आफ धि कोर्ट मि. पि. थोरिस जे बाळापूर येथें आ० तहशिलदार होते त्यांस गेले बुधवारी रात्रीं येथें विषमज्वरानें देवाज्ञा झाली. हे तरुण, होतकरू व आपले कामांत बरेच वाकबगार असत. यांचा स्वभाव मनमिळाऊ असल्यामुळें हे पुष्कळ लोकप्रिय झाले होते. यांचे प्रेताबरोबर सुमारें चारशे लोक स्मशानांत गेले होते. यांस एक लहान मुलगा व एक वर्षाची एक कन्या हीं अपत्यें आहेत.

---

एलिचपूर येथील डेपुटी कमिशनचे इंग्रजी आफिसांतील सेकंड क्लास मि. रिचर्डसन यांस कालऱ्यानें देवाज्ञा झाली.

---

येथील मोरना नदींत गेल्या गुरुवारीं एक छिन्नभिन्न व भेसूर असा मुडदा सांपडला. बहुतेक हा इसम हिंदु असावा असें दिसतें. खून झाला किंवा आत्महत्या घडली याचा पक्का निर्णय नाहीं.

---

आभारपूर्वक स्वीकार—शेतकरी—आगष्ट; आर्यभिषक्, आक्टोबर, भिषग्विलास-आक्टोबर, सद्धर्मदीप—भाद्रपद; दिवाणी न्यायखात्याचा रिपोर्ट—१८९१; डेकन कालेज त्रैमासिक—अंक २; व मुलकी रिपोर्ट १८९१-९२.

---

## नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७ कलम ६ प्रमाणें दि. कि. क्लास १५ मि. नंबर १४

१८९२

विद्यमान स्पेशल अ० कमिशनर साहेब जिल्हा अकोला यांचें कोर्टांत.

नांव साहेबराव वलद आबाराव अ० पा. करणार आई चंद्रभागा व विमाई जवळे जानराव देशमुख मुखत्यार देवीदास बळवंत राहणार पिंपळ खुट तालुके बाळापूर जिल्हा अकोला यांचे कर्ज वसुल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून सदर्हु अर्जदार यांणें अर्ज केला आहे त्यास करितां सदर्हु मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचें द्वारें कळविण्यांत येत आहे कीं तारीख २२ माहें अक्टोबर सन १८९२ इ० रोजी सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्क विषयी लेखी हकीकत दाखल करावी तारीख ६ माहे अक्टोबर सन १८९२ इ.

V. N. Dandekar.

सीविल ज्यडज्य.

( शिक्का )

## वर्तमानसार.

या चालूं वर्षांत हिंदुस्थानच्या जमाखर्चांत सुमारें दीड कोट पर्यंत तोटा येईल असा सुमार आहे असें ह्मणतात. अफूच्या पेटीचा भाव दर पेटीस ११०० व १२०० रुपये आहे तो १३०० व १४०० रुपये केल्यानें हां तोटा भरून येण्याचा अदमास आहें; पण बंगाल्यांतील अफूचें पीकच कमी असल्यामुळें असा दर वाढवून ही कोट पाऊण कोट तोटा येईलच असें दिसतें. याशिवाय सरहद्दप्रकरण दत्त ह्मणून उभेंच असल्यामुळें त्यास किती खर्च लागेल याचा अदमास ही कळत नाहीं. लार्ड रार्बटची स्वारी जी अमिरास भेटण्या करितां जलालाबादेस जाणार आहे त्या स्वारी बरोबर फौजफाटाही पुष्कळच जावयाचा असून त्या स्वारीचा सर्व थाट राजकीय असावयाचा असल्यामुळें त्याबद्दलचा खर्च वेगळाच आहे. आणि सर्व खर्च, हुंडीच्या भावानें रुपयांची किंमत जी दहा आणे झाली आहे त्या दहा आण्यांच्या रुपयांच्या वसुलांतून भागवावयाचे आहेत. पामीर प्रकरण जें डोकावीत आहे तें बळकावण्याच्या बदला थंड होत चालल्याचे जरी दिसतें आहे तरी तें एक वेगळेंच आहे. मिळून हिंदुस्थानची राजकीय स्थिती जशी भयप्रद दिसत आहे त्याच प्रमाणें जमाखर्चाची स्थितीही फार भयंकर दिसत आहे; आणि या जमाखर्चाच्या भयंकर स्थितींतून हिंदुस्थानच्या दुबळ्या प्रजेचा कसा निभाव लागेल याची मोठी काळजी आहे. हिंदुस्थानचे लोक आंधींच इनके दरिद्री बनले आहेत कीं, त्यांस पोटभर अन्नही मिळत नाहींसें झालें आहे, व त्यामुळें त्यांचें शरीर अगदीं मृत्यूच्या चित्रासारखें झालें असून त्यांतच ही हुंडणावळ, सरहद्द, स्वारी, वगैरे निघाडें त्यांचे लचके तोडण्यास तयार झालीं आहेत. तेव्हां ईश्वर त्यांचा कसा बचाव करील याची काळजी आहे.

अमेरिकेंत विजेनें चालणारी एक नवीन गाडी चालूं होणार असून ही दर तासास १५०—२०० मैल मार्गक्रमण करणार असें ह्मणतात.

जशास तसें—मेटकाफ लायब्ररींत एक नेटिव गृहस्थ एक वर्तमानपत्र हातांत घेऊन वाचीत होता. तेथें एक युरोपियन आला आणि त्यानें त्या नेटिवाजवळचें पत्र मागण्याच्या बदला कांहीं न बोलतां एकदम त्याच्या हातांतून हिसकून घेतलें. या अनोळखी माणसांचें हें असलें वर्तन त्या बाबूस आवडलें नाहीं, ह्मणून त्याणें पटकन उठून त्या साहेबांस धरलें आणि धाडकन जमिनीवर पाडलें आणि खिडकींतून खालीं टाकून देतों अशी त्यास धमकी दिली. स्वप्नांतही नसलेला हा सत्कार मिळतांच साहेब बहादूर लागलेच शुद्धीवर आले आणि आपल्या वाईट वर्तनाबद्दल त्या बाबूची माफी मागितली आणि पुढें ते साहेब त्या लायब्ररींत कधीं आढळले नाहींत.

रेलवेस्टेशन उचललेः— चेशायरमध्यें जाइन्ट रेलवे कंपनीचे फ्रॉडशाम नामक स्टेशन आहे. ह्या स्टेशनचा प्लाटफार्म अगदीं लहान व गैरसोयीचा असल्यामुळें बरेच दिवस कुरकुर चालली होती; शेवटीं वाटाघाट होऊन स्टेशनमास्तरचें घर, तिकीट आफिस व उतारूंचें विश्रांतिगृह हीं सुमारें सहाफूट मागें सारून प्लाटफार्म रुंद करण्याचें ठरलें. इमारत तर पाडूंनये व जशीच्या तशीच मागें उचलून ठेवावी असें त्या कंपनीचे इंजिनिअरचे मनांत येऊन त्यांनीं इमारती खालीं पोकळी करून लांकडांच्या मोठमोठ्या तक्त्यांचा तीस आधार दिला; व यंत्र साह्यानें ती सर्व इमारत सहा फूट मागें उचलून ठेविली! ह्या अचाट कृत्यांत काय तें घराचें धुरांडें मोडलें बाकी सर्व इमारत उत्तम रीतीनें उचलितां आली. अकलेची कमाल झाली!

१८९२ च्या मुंबईच्या मीठ अक्टास गव्हरनरजनरलांची मंजुरी मिळाली.

मि. माणकजी पेस्तमजी मोदी हे मुंबईस नवे बारिस्टर झाले.

अमिराच्या फौजेनें हजारा बंडखोरांवर एक मोठा जय मिळविला, व आतां तो बखेडा मोडल्यासारखा झाला.

हिंदुस्थान तें अफगाणीस्थान यांची सरहद्द कायम व्हावयाची आहे ह्मणून तुह्मास आजच नेमणुक करून देण्यांत येत नाहीं असें सांगून अमिरानें वजिरीलोकांस परत पाठविलें.

आह्मी इंग्रज सरकारचे हितचिंतक आहों असें सांगण्याकरितां पुष्कळ वजिरी लोक आपल्या पुढाऱ्यांसह बाना येथून कांजुरी कच येथें आहेत.

विजयापटन पासून येलामंचेली पर्यंतची रेलवे चालूं झाली.

ऐर्लंडांतले शेतकरी व जमीनदार यांच्यांतल्या लढ्याची तपासणी करून रपोट करण्याकरतां सरकार लवकरच एक कमिशन नेमणार आहे.

बंगाल्यास दरोडे पडण्याचें प्रमाण वाढत चाललें आहे.

कानड्याचीं मच्छीमार गलबतें रशियानें पकडल्यामुळें त्याची चवकशी करण्याकरतां कानडा सरकारच्या विनंतीवरून इंग्लंडचें एक लढाऊ आरमार तिकडे रवाना झालें आहे.

अफ्रिकेंत गेलेल्या जर्मन कंपनीनें त्या देशांत तंबाकूची लागवड करण्याकरतां चिनी लोकांस नेलें आहे.

इंग्रजांनीं इजिप्त सोडावें हेंच चांगलें असें सर डिलके यांचें ह्मणणें आहे.

कुरम खिंड ताब्यांत घेण्याकरतां सरकारची फौज लवकरच रवाना होईल व त्यांत पेशावरचा डेपुटी कमिशनर मि. मर्क हा मुख्य आहे. असें अलहाबादची तार सांगत्ये.

ठा० अ०

सांगली येथील प्रसिद्ध नाट्याच्यार्य मि. विष्णुपंत भावे यांनीं आज कित्येक दिवसांपासून आपली बुद्धि खर्च करून विहिरींतून पाणी काढण्याचें मोठें यंत्र तयार केलें असून त्याचा उपयोग चांगलें प्रकारें होऊं लागला आहे. सदर्हू यंत्र मि० भाव यांनीं पेटंटही केलें आहे असें ह्मणतात. ज्या कोणास थोडक्या खर्चा मध्यें काम व्हावें असें वाटत असेल त्यानें अवश्यमेव या यंत्राचा उपयोग करून पहावा. हें यंत्र चार बैलांचें काम एका बैलावर भागवितें किंमत मात्र ३-३॥शें रु० पर्यंत पडेल. स० शो०

मुंबई, यंत्राचा धोबीखाना— महालक्ष्मी वरील धोबीवाड्यामधील ७०० चौरसवार जमीन मुबारक हसन नांवाच्या एका इसमानें दोन वर्षांच्या करारानें घेतली आहे. येथें तो कपडे धुण्याचा यांत्रिक कारखाना घालणार आहे.

चिनांत आपलें सूत पुष्कळ खपतें. तें चिनीलोक घेऊन आपलें सूत मिसळून आपल्या देशच्या रिवाजा प्रमाणें कापड तयार करितात. चीनच्या लोकांत कोणत्या तऱ्हेचे कापडाची आवड आहे ते पाहून कोणी इकडून तयार कपडाच तिकडे पाठवितील तर तो चांगला खपून दरही चांगला येईल. गिरण्यांच्या मालकांनीं इकडे लक्ष देण्यासारखें आहे. सु० प०

देवास येथील धाकट्या पातीच्या गादीवर मल्हारराव बाबा साहेब पवार यांस तारीख २२ रोजीं मे० क्राथवेट साहेब मध्य हिंदुस्थानचे गव्हरनर जनरलचे एजंट यांणीं बसविलें. त्यावेळीं मोठा समारंभ केला होता.

लोखंडाच्या खाणीची खटपट— सरदार दिलारजंग निजाम सरकारचे एक सरदार व नामांकित नौकर हे निजाम सरकारच्या हद्दींत जी दगडी कोळशाची खाण आहे; तिच्या नजिकच्या लोखंडाच्या खाणीचीं कामें त्याच कोळशानें चालूं केलीं असतां कशीं काय फायदेशीर होतील हें पाहण्याची खटपट करीत आहेत. डेंकन मायनिंग कंपनीचे माजी इंजनेर मि० किरकप यांच्या मदतीनें हा अनुभव पाहण्याचा दिलारजंग यांचा मानस आहे. हा अनुभव पहाण्यासाठीं त्यांनीं यंत्रें जंत्रें आणविलीं आहेत.

सू० सु०

## जाहिरात

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुस्त्या रंगबाज व कमिशन जास्त पाहून कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्त्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्हाल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १८५ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ८१० आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिश याजवर दर डबीस किं. १८=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १८—

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥। हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फुल वडस रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १८६

ह्या शिवाय पोष्टेज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेश मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य कुरणखेडकर अकोला गंगाधरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचारची किंमत
वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०१३
साहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास .....०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .....०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Rs.
Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly.....3 " 8 as
Single copy.....4as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition pe line3as

VOL XXVI AKOLA MONDAY 17 OCTOBER 1892 NO 41

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख १७ माहे आक्टोबर सन १८९२ इ० अंक ४१

डा० वामन गोपाळ यांचा
सार्सपरिला

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग जसें सर्व शरीरास केड सुटणें, खरूज मळवें वफोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें वकच्चा पारा सेवन करून होणारे बाईट परिणाम वैगेरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरे औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फाकरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुस्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तात्कालीक नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व जु व मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जतंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचें एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून किती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा
कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचेकेस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्हो. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.

## उनाड मुलगा.

भाग १ ला

नान्या लहान असतां फार दांडगा होता. तो १।९ वर्षांचा होई पर्यंत त्याच्या बापानें त्याची मुंज केली नव्हती. तो म्हणे याचा जन्म ब्राम्हण कुळांत पण कृति शुद्राची दिसते. लिहिण्या वाचून नान्याला पाहिजे त्यानें हवे तें काम सांगावें, तें तो खुशीनें करी. एकदां त्याच्या बापानें त्याला ओढीत ओढीत माडीवर नेलें आणि धूळ पाटीवर घडा घालून दिला. नान्या घडा वळवीत आहे असें पाहून बाप पोथी वाचू लागला. इतक्यांत बापाची नजर चुकवून नान्यानें जवळच्या खिडकींतून खालीं उडी टाकली. बाप घाबऱ्या घाबऱ्या खालीं येऊन पाहतो तों नान्या कोणीकडे गेला त्याचा पत्ता नाहीं. त्या दिवसा पासून बापानें नान्याचा नाद सोडून दिला. इकडे नान्या ही निर्धास्त होऊन वाटेल तिकडे जावें, पाहिजे तें करावें असा मनसोक्त वागू लागला.

एकदां बापाला नान्याला ताळ्यावर आणण्याची एक युक्ति सुचली, ती अशी कीं नान्याला जेवूं घालूं नये. त्यानें घरांत सक्त ताकीद दिली कीं नान्या खावयास मागूं लागला कीं एक घडा पाठ कर म्हणजे देतो नाहीं तर नाहीं असें म्हणावें. घरांत बापाचा धाक फार होता म्हणून नान्याच्या आईला किंवा दुसऱ्या कोणत्याही मनुष्याला त्याला चोरून देखील अन्न देतां येईना पण नान्या कसला वस्ताद. त्यानें एक दोनदां खटपट करून पाहिली. उपयोग होत नाहीं असें पाहून त्यानें मोलकरणीच्या घरीं जाऊ तिच्याशीं संधान बांधिलें. तिच्या येथें चटणी भाकर खशाल खात असे. रोज सकाळीं व संध्याकाळीं गुरांच्या वाड्यांत जाऊन वासरें सोडून गाईंचें दुध काढून पीत असे. घरांत दुधाचा तोटा येऊ लागला व नान्या कुणब्याच्या घरीं अन्न खातो असें बापास समजतांच त्यानें नान्याला घरांतून अन्न देण्याची मोकळीक दिली व निराश होऊन प्राक्तनावर हवाला देऊन स्वस्थ बसला.

नान्याच्या वयाला नऊ वर्षें पुरीं होऊन दहावें लागलें, तरी त्याच्या मुंजीची बाप गोष्टच काढीत नाहीं असें पाहून, त्याच्या आईस फार दुःख होत असे. तिनें अनेक वेळां पतीची मर्जी सुप्रसन्न पाहून नान्याची गोष्ट काढावी आणि ह्मणावें कीं नान्याचें मन जरी विद्येकडे लागत नाहीं, तरी दुसरीं कामें त्याला करितां येत नाहींत किंवा करण्याला तो खुष आहे असें नाहीं. तो बागेचें शिंपणें करितो, गाड्यांवर देखरेख करितो, गड्यांबरोबर काम करितो, जें सांगावें तें काम तो मन लावून करितो. सगळेच लोक का विद्वान होतात! तुम्ही आतां अशक्त होत चालला आहां, मेहनतीचें काम होत नाहीं म्हणून शेतीचें काम नान्यावर सोंपवावें म्हणजे झालें. अशा अनेक रीतीनें अनेक वेळां तिनें नान्याची गोष्ट काढली परंतु व्यर्थ. तो साफ ह्मणे कीं मी नान्याची मुंज प्राण गेल्यास करणार नाहीं. कामकरी गड्या प्रमाणें मी त्याला वागविण्यास तयार आहे.

अशा रीतीनें आई निरुपाय झाल्यावर तिनें आपल्या माहेरीं निरोप पाठवून आपल्या आईस बोलावून घेतलें आणि तिला नान्याचें सर्व वर्तमान सांगितलें. तिनें ही जांवयाचें मन वळविण्या करितां आपली पराकाष्ठा केली परंतु व्यर्थ. शेवटीं तिनें नान्याला आपल्या घरीं नेऊन त्याला विद्या शिकविण्याची खटपट करित्यें ह्मणून ह्मटलें. हें मात्र त्याला फार आवडलें आणि मोठ्या आनंदानें त्याला नेण्याची परवानगी दिली व त्याच्या खर्ची करितां कांहीं पैसा ही दिला.

भाग २ रा

नान्याची आजी फार चाणाक्ष, शहाणी, व धूर्त बायको होती. पहिल्यानें नान्यालवळ शाळेंत जाण्याची गोष्ट दखील काढिली नाहीं. नान्यानें कांहीं केलें, तरी तो त्याला चकार शब्द ही बोलत नसे. नान्यामध्यें एक गुण विशेष असे, तो आजीच्या तेव्हांच लक्षांत आला, व त्याला योग्य दिशा दाखविली असतां तो ताळ्यावर येईल अशी तिला आशा आली; तो गुण ह्मटला ह्मणजे लिहिण्यावांचुन दुसऱ्या कोणत्याही कामांत त्यानें आजीच्या किंवा घरांतील इतर माणसांच्या अर्ध्या वचनांत असावें. यामुळें तो सर्वांस फार प्रिय झाला होता.

नान्याच्या आजोळीं एक सरकारी शाळा असे. तेथील हेडमास्तर आजीचे आप्त होते. त्यामुळें ते कधीं कधीं आजीच्या भेटीस येत असत. एके दिवशीं संध्याकाळीं शाळा सुटल्यावर ते आजीच्या भेटीस आले होते. पडवींत शेपाळा टांगला होता त्यावर बसले होते. आजी ओसरीवर खांबाशीं टेकून त्यांच्याशीं गोष्टी करीत होती. इतक्यांत राहाटाचे बैल सोडून, दोन हातांत दोंवां बैलाच्या दोऱ्या धरून हेक हेक करीत नान्या तिकडून आला. तो सभोर कोड्यांत गेला. आणि बैलांना खांबाशीं बांधतांना तोडानें (लावणी) "मोत्याचे गुण कित्ती तरी सांगूं गरिब तरी हा किती, जयाला आउ माझी चा हता" कोरे सोन्या गुलामा तुझ्या पुढें इतका चारा असून तूं मोत्या पुढला चारा कारे खातोस? मोठा लबाड आहेस रे तूं! दमबर, उद्यां खालच्या आगरांतल्या राहटाला खुप लोंढे बांधतों आणि मग पाहतों कसा ओढतोस तो" असें बडबडत ओसरीवर आला आणि आजीपाशीं येऊन बसला आणि म्हणाला "आऊ, सोन्या किताई मोठा लबाड आहे. गुलामाला खुप खेचून बांधला आहे, आज. मोत्याच्या चाऱ्याला त्याचें तोंडच पुगायच नाहीं. खोड मोडतों गुलामाचो"

आऊ— तुझी रे कोण खोड मोडिली?

नान्या—आऊ (आजीचें नांव) मी गो काय केलें खोड मोडायला?

आऊ— तो पहा बरें आपा कसा बुक घेऊन वाचीत बसला आहे तो. तू तसा बसला नाहींस ह्मणून ह्मणत्ये. बुकाचें नांव घेतांच नान्या जो निसटला, तो धूम पळत देवीच्या देवळा कडे गेला.

हेडमास्तरांनीं हें रत्न पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें. आज त्याला प्रथम पाहिल्या पासून हा कोण असावा, याची जात काय? आऊचा याचा संबंध काय वगैरे प्रश्न त्यांना सुचले. गोंधळांत पडण्याचें कारण मुलगा मोठा दिसत असून त्याला लंगोटी नाहीं, जानवें नाहीं कुणब्याचा ह्मणावा, तर वर्ण गोरा, भाषा शुद्ध, बोलणें गोड. यांतील इत्यर्थ त्यांना कळेना ह्मणून त्यांनीं आऊला विचारलें. अऊ, कोण गो हा नवीन मुलगा? आऊ— माझा नातु हो तो. वालीचा मुलगा.

मास्तर—काय ह्मणत्येस काय आऊ, हा वालु आकाचा मुलगा! आणि अजून मुंज नाहीं! चमत्कार आहे बुवा!

आऊ—काय सांगू नाना. जसा एखाद्याला एखादा पदार्थ शिसारी बसला ह्मणजे त्याचें नांव घेतांच तिटकारा येतो. तसें या माझ्या नान्याला शाळा, पुस्तक या नांवांचा तिटकारा आहे आतांच पाहिलेंसना बुकाचें नांव घेतांच कसा फुटाण्या सारखा उडून गेला तो.

मास्तर—ह्मणून का त्याची मुंज करीत नाहीं? मुळा तर तो मोठा चालाख आणि हुशार दिसतो. आतांच्या आतांच त्यानें लावणी नवी करून ह्मटली ती ऐकलीस ना? शीघ्र कवीच आहे, तो. बरें मुर्ख निघाला तर त्यांची मुंज का ठेवायची? काय हा वेडेपणा.

आऊ—नाना, त्याचा बाप किनई, मोठा हट्टी माणूस आहे. एकदां त्यानें नाहीं ह्मटलें ह्मणजे कुणाचें ऐकावयचा नाहीं. याला थोडी विद्या आली, तर तो मुंज करणार. नाहीं तर नाहीं. त्याला तुझ्या स्वाधीन करण्याकरितां ह्मणून येथें आणला आहे. आतां पाहत्ये तुझी करामत.

मास्तर— बरें, पहा त्याला उद्यां शाळेंत नेतों. हाचसा काय? अशीं शेकडों मुलें आम्ही ताळ्यावर आणितों. त्यांत हा तर शहाणा, हुशार आहे. याला कांहींच वेळ लागणार नाहीं. आऊ, मी जातों आतां संध्येची वेळ झाली.

असें ह्मणून मास्तर आपल्या घरीं गेले. जातांना नान्या देवीच्या देवळाकडून येतांना त्यांनीं पाहिला. तो जवळ येतांच मास्तरांनीं त्याला जवळ बोलावून त्याचा हात धरून विचारिलें, "बाळा, तुझें नांव काय? तू कोणाचा मुलगा!" "माझें नांव नान्या. मी वाबांचा मुलगा. काळोख पडत चालला, मला

जाऊं द्या घरीं. आऊ रागें भरेल. " "काय रे, पण तूं मघां पळून कां गेलांस? " " सोडा हो माझा हात. उशीर करून मला मार बसवायचा आहे तुमच्या मनांत, समजलों " असें म्हणून त्यानें जो हिसका दिला, त्यानें तो पोकळा होऊन धांवत आपल्या घराकडे गेला. ( पुढें चालेल )

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन वद्य १२ शके १८१४

वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मुसलमान लोकांना मिळावें अशी निजाम सरकारची उत्कट इच्छा आहे. आपल्या मनोदया प्रमाणें त्यांनीं आपल्या राजधानींत कालेज स्थापलें आहे इतकेंच नव्हे तर आपल्या प्रजे शिवाय जे इतर मुसलमान आहेत त्यांस उच्चप्रतीचें विद्यामृत पिण्यास मिळावें म्हणून दरसाल ४२०० रुपयांची निराळी देणगी करून दिली आहे. मुसलमान लोक गरीब फार असतात व त्यांस विद्येची अभिरुचि मोठीशी नसते तेव्हां त्यांस कालेजांतून शिकणें सुलभ व्हाव व स्कालरशिपीच्या ईर्षेनें पुष्कळजण शिकण्यास पुढें सरसावे असा या देणगीचा हेतु आहे. वरील ४२०० रुपये देणगी पैकीं ६०० रुपये मुंबई इलाख्या निमित्त ठरविले असून ती रक्कम मुंबईच्या ' अंजुमान-इ-इस्लाम ' या संस्थेकडे सोंपविली आहे. मुसलमान लोकांचे साठीं कां होईना, पण स्वराज्याची धोरवी व स्वजातीचा अभिमान या कांहीं अद्भुत प्रेरणा आहेत!

हिंदुस्थानच्या जमाखर्चांत यंदा दीड कोटीची तूट पडेल असें म्हणतात. ही तूट भरून काढण्याच्या विचारांत हिंदुस्थानचे फडणीस सर डेव्हिड बारबर निमग्न आहेत. आमचे राज्यकर्ते असे दिवाळखोर आहेत कीं, ते कुबेराला ही भिकारी करितील. हिंदुस्थान देशास संपत्तीचें माहेरघर म्हणतात परंतु खरोखर पहातां राज्यकर्ते कर्जबाजारी. यंदा पाऊस पाण्यानें मेहरबानी केली आहे तेव्हां जमाबंदीचा वसूल बिनघोर येईल. पण सोन्या रुप्याच्या भावा मधील प्रमाण वाढत्या अंतराचें आहे म्हणून ही तूट पडणार असावी. आह्मास उपाय तर तीन साध्य दिसतात. कर्ज काढावें, खर्च कमी करावा अगर नवे कर बसवावे. कर्ज काढून तूटेची निपूर भरून येत नसते. कर्ज वाढतें व व्याज वाढतें म्हणजे अखेरीस सर्व बोजा प्रजेच्या माथीं बसतो. खर्च कमी करण्यास मात्र सवडी अनेक आहेत. लष्करी खर्च विनाकारण वाढत आहे. हिंदुस्थानचे सेनाध्यक्ष अमीराच्या भेटीला जाणार आहेत म्हणजे लहस्रावधि रुपयांचा फन्ना पाडण्याची तजवीज नव्हे काय? शाळाखातें कमी खर्चावर चालवा, कोर्ट पब्लिक खात्याचा खर्च बंद करा, वगैर प्रजेच्या अकल्याणाच्या सूचना पुढें येतील अशी मात्र भिती आहे. गोरे पगारदार आमच्या देशांतून हजारो रुपयांचे थैले लांबवितात तरी त्यांच्या ओरडेची अगीदरच धुमाकूळ चालली आहे. तेव्हां खर्च कमी होऊं शकत नाहीं कजें काढूं नये असे कोणी हा शहाणा समजदार मुत्सदी कबूल करील. तेव्हा तिसरा उपाय नवीन कर बसविणें होय. मिठावर नवा कर बसवितांच येत नाहीं. सध्यां जो आहे तोच लोकाच्या डोक्या वरून गेला आहे. आयात कापडावर कर बसवावा तर म्यानेस्टरचे व्यापारी आकाशपाताळ एक करून सोडतील. आह्मी म्हणतो कीं, आमचे देशी कापडाचे कारखाने चांगलें सांवरले आहेत तेव्हां त्यांच्या संरक्षणार्थ आहे म्हणून ज्या करा बद्दल इंग्लंडचे गिरणीवाले ओरडतील तो पूर्वी बंद झाला आहे तसाच बंद राहावा. आयात कापडावर कर ठेवून देशी गिरण्यांच्या कापडावर कर बसविला तर दोन्ही मालाच्या किंमतींत अंतर पडणार नाहीं हें खरें पण परिणामीं त्या पासून प्रजेची नागवणूक होणार आहे. निष्प्रतिबंध व्यापाराच्या तत्वाला झुगारून इतर आयात मालावर कर बसविला तर नटिवांची कुरकुर नाहीं. परंतु तेणें करून होणाऱ्या मालाचा खप व भरभराट हीं विलायतच्या लोकांस स्वस्थपणें कबूल करवतील अशी वस्तुस्थिति नाहीं तेव्हां या संकटांतून राज्यकर्त्यांचा बचाव व प्रजेचा निभाव हे कसे लागतात पहावें!

नवें जुनें हो जगाची रहाटी आहे तरी एखादा महात्मा पुरुष मरण पावला म्हणजे मनाला दुःख वाटणें हाहो मनुष्यधर्म आहे. सरदार गोपाळराव हरी देशमुख हे पुणें मुक्कामीं गेल्या ९ वे तारखेस निवतले हें ऐकून प्रत्येक महाराष्ट्रीयास वाईट वाटेल. सरदार गोपाळराव आपल्या वार्धक्यांत म्हणजे वयाचे ७० वे वर्षीं मरण पावले. मनुष्य वृद्ध, अनुभवी व बहुश्रुत होत जातो तसातसा तो भाग्यशाली, नीतिमान व लौकिकसंपन्न गृहस्थ असेल तर त्याचा जगास बहुत फायदा होतो. त्याचा लोककल्याणाचा बाणा नानाविध प्रकारांनीं फलद्रूप होतो. त्याचें वजन वाढतें, इभ्रत वाढते, चार लोक त्यालाच अनुवर्तू लागतात आणि धुरंधरपणा त्यालाच चांगला साधतो. वृद्ध माणसाची किंमत इतिहासवृद्धा अशी वाढत असते तेव्हां सरदार गोपाळराव यांच्या मरणानें आपली हानि केवढी झाली आहे हें त्यांच्या चरित्रांतील लोकोपयोगी कृत्यांवरून व त्यांच्या आंगच्या सद्गुणांच्या पूर्ण विकासा वरून कळून येईल.

सरदार गोपाळराव हे गर्भश्रीमान होते. यांचा जन्म १८२३ त झाला. यांचे पणजे व तीर्थरूप यांनीं पेशवाईंत मोठमोठीं कामें करून ' देशमुखी ' संपादली होती यांचा अभ्यास अव्वल इंग्रजीच्या वेळचा होता. हे शाळेंत इंग्रजी शिकत होते त्यावेळीं यांची मातोश्री, त्यास संध्याकाळीं सचैल स्नान घालून नंतर घरांत येई अशा कडक व्रतानें यांची विद्या झाल्यावर १८४४ त हे सरकारी नोकर झाले प्रथम हे दक्षिणेतील सरदाराचे ७० रुपये पगारावर एजंट झाले आणि शेवटीं खुद्द त्याच सरदारांच्या पंक्तीस आपल्या बुद्धिमत्तेनें, विद्वत्तेनें व अधिकारानें येऊन बसले ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. नेटिवास सिव्हिल आणि सेशन जज्ज नेमलें असें यांचेंच पहिलें उदाहरण होय तेव्हां सरकारापाशीं यांचा मान मोठा होता हें निराळें म्हणणें नको. सरकारी नोकरींतच हे उदयास आले असें नाहीं. महाराष्ट्रांत नेटीव वर्तमानपत्राची स्थापना बहुतेक यांनींच केली. ' ज्ञानप्रकाश ' व ' इंदुप्रकाश ' यांचे जनकत्व व प्रकाशकत्व यांच्याकडे होतें. अहमदनगरच्या अस्तंगत ' वृत्तवैभव ' पत्रांत यांचेंच धुरीणत्व असे. सरदार गोपाळराव 'लोकहित वादी' या अभिधानानें महशूर आहेत. लोकहित वादी या सही खालीं त्यांनीं विस्तारपूर्वक अनेक लेख लिहिले आहेत. त्यांत मुख्य मुद्दा इंग्रजीचा चांगुलपणाच दाखविण्याचा आहे. के० विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं याच ' लोकहितवादी ' ला अमर करून टाकलें आहे. यांचें इतिहासज्ञान फार मोठें होतें म्हणून यांस ' माहितीचें भांडार ' हें टोपणनांव देत असत. यांनीं इतिहासावर अनेक लहान मोठीं पुस्तकें लिहिलीं आहेत. सर्व हिंदुस्थान देशभर हे हिंडले फिरले होते म्हणून माहितीचें हे दीलदस्तरच असत.

सामाजिक सुधारणेच्या पक्षाचे हे अग्रणी असत. पुनर्विवाहाच्या मंडळींत हे पुढारी होते धर्मग्रंथ ही यांनीं अनेक वाचले होते. हे वर्तनानें चोख, वचनाचे धड व स्वभावानें परोपकारी असत. गरीब लोकांच्या साठीं घरीं धर्मार्थ औषधें हे स्वतां देत असत. यांचीं मुलें वडिला पेक्षां एक कांकणभर ज्यास्त लौकिकवान, विद्यासंपन्न व हुद्देवालीं आहेत. त्यांपैकीं डाक्टर मोरेश्वर गोपाळ देशमुख सुप्रसिद्ध व लोकमान्य आहेत. ईश्वर सरदार गोपाळराव यांच्या आत्म्यास उत्तम गति देवो अशी आमची प्रार्थना आहे.

सरदार गोपाळराव यांनीं आत्मचरित्र स्वतःच लिहिलें आहे. ते लवकर प्रसिद्ध होईल तितकें बरें. चरित्रा पासून ज्या ज्या बोधाच्या गोष्टी घेण्या सारख्या असतात त्या यांच्या चरित्रांमध्यें पुष्कळ सांपडतील. यांचें चरित्र म्हणजे बहुतेक पेशवाई बुडाली तेव्हांच्या काळा पासून एका पाऊण शतकाचा महाराष्ट्राचा लहानसा इतिहासच आहे. सरदार गोपाळराव यांनीं चरित्र इतिहासाच्या बाजूतें म्हणजे स्वतःच्या वंशाच्या हकिकतीचें वर्णन इतर आजूबाजूच्या गोष्टी विस्तारपूर्वक गोवून लिहिलें असल तर हें चरित्र मोठें विश्वसनीय व माहितीचें भाण्डार होईल अशी आमची खात्री आहे. तेव्हां त्यांचे चिरंजीव आपल्या तीर्थरूपांचें चरित्र लवकर प्रकाशित करितील असें आह्मी इच्छितों.

Ourselves

Our subscribers will, we hope, allow us the usual Dewali Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these days there will be no paper issued on the 24th. current.

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER, 17 1892.

We have already alluded to the rules which the Resident has framed to facilitate and amplify the usefulness of the Agriculturists' Loans Act XII of 1881. The aim is to better the condition of the sinking peasantry and we think that the law viewed in the light of the above rules is a workable one. Mr. Plowden has a deep insight into the matter. He knew full well that something like an agricultural bank is wanted for Berar. The whole credit of the recent measure is due to him. He took a right action in the right direction. We are obliged to him for this piece of urgent reform; and we hope that he will take steps to make the new rules widely published and well understood in all agricultural circles. Though the loans are limited to a fixed fund the principle upon which the loans are to be extended is a broad one and will admit of a liberal expansion so as to exhaust that fund. The usefulness of the measure and the hearty welcome that it will receive with the public will enable the Resident to increase the funds and to afford a better and more liberal help to the appreciating agriculturist.

What is needed at present is a wide circulation of the rules in our vernaculars and then the people will learn the full force and free scope of the application of the Agriculturists' Loans Act. Col. Mackenzee has, in his report on the Revenue administration, made a remark which deserves our careful attention in regard to these rules. He has well pointed out a drawback in the useful working of this limited Agricultural Bank in Berar. Those of the ryots who are free from the trammel of a money-lending Shylock can alone afford to avail of the Governmental help. This remark of the Commissioner raises a question whether a land-holder in debt to a Sawkar can have a loan from the Government to pay him off. This is not of course a primary agricultural object. The money is to be expended on extinguishing old debts but this is indirectly an attempt to improve one's income out of the land-produce and is so far agricultural. But we do not think that under the present rules a loan can be made to such a needy person. We hope that the Resident will remove this condition. Such an amendment is rather a necessity. The agricultural loans will otherwise fail to improve the status of the peasantry. These will tend to enrich not those land-owners who are in debt but those who being already well—to—do men stand in need of a loan or desire to make money with the lesser rate of interest on the Government loans. Men of the latter type will thus manage to undo the excellent object of these loans. We would expect at least this change in the rules. In the execution of decrees the executing officer has the power to let, mortgage, or farm any survey number and we request the Resident to frame a rule by which the officer will be enabled to mortgage the estate to the Governmet and take a loan from it to satisty the claims in the decrees. If this be possibe the Kunbi will care a fig for the Sawakar and will not be afraid of a court—decree because in the last resort he will have the advantage, through the executing officer, of opening a new account with the Government at a low rate, viz, 6 per cent We hope that Col. Mackenzie who is busily anxious to make his career productive of great results, will arrange to suggest such changes as noted above and then Mr. Plowden is sure not to let off the chance as he has made the subject his special study.

The District Police Superintendent of Akola Mr. N. R. Cumberlege left

Akola on Thursday last to join his new appointment at Amraoti. We are unwilling to bid him good bye and he carries with him our respect and good wishes for long life and prosperity. He was at Akola for these eight years and has made a special mark in the departmental service. He is an officer of quick despatch, solid common sense and high abilities. He is a strong hand at work and is a man of a full measure of vigour and energy inepite of his old age. He has bourne creditably the brunt of his high office. He is liked by his subordinates because though he is a task-master to them he never shifts responsibility from his shoulders so as to lay his finger on a particular person under him. This is a peculiar merit worth men tion. He himself stands before a *Burra Sahib* and never lets his men abide the chance of being found fault with. English is his mother tongue and for any qualifi cation in it he does not deserve special noti ce but he knows Marathi well and for his familiar understanding of the Marathi tongue he once won the applause of a Bombay Pleader of established reputa tion. He is a man of thorough honesty and the probity and sterling credit of his good name is proverbial in the police de partment. Nothing is likely to ooze him and no deviating influences will permeate his tried sense of justice. The only fault that we would openly notice is that with him his first impressions go a long way. Whoever first reaches his listening ear will prevail with him for a good deal unless he unwisely loses his credit with him. He thus weighs his own beliefs rath—er than evidence and is often led into disagreeable mistakes. He gives weight, not in full view of the probable conse quences, to minor details of cunning and and flattery and unwittingly runs the risk of giving opportunities to scheming and intriguing people. His temper may probably have received a tinge of sourness and got him to act indifferenly in the full swing of his whims. Being rather a man of stern principles he may have erred in the police intricacies and the diverse affairs of daily life. But he is withal a moral man and has a number of compensating qualities. He has lived through out a true English gentleman and his good character commands honor and admiration and these we shall ever give him as his due.

---

We have a thoughtful and learned lecture in the speech of Mr. R. Sewell a Collector in Madras. He lays great stress to point out what India wants at the present day. Education ought to be a life-long work and that science should be a speciality of an Indian student because his country is so vast and rich in the manifold and abundant resources of nature. In the following significant and well-worded expressions he defines what education is not and prepares his listener's mind to learn the right view of education.

"Education, you must remember, is a word very aptly applied to its present meaning. It does not mean to fill your mind and your memory with stores of material not there before. It does not mean to implant knowledge. It does not mean to render you, by study and read ing, fit, and efficient to pass examinations and thereby to qualify yourselves for Government services or any other kind of service. It does not mean to teach you a lot of stuff which properly digested and reproduced on paper will finally enable you to append to your signature the coveted letters "F. A." or "B. A." Edu cation is not to implant or put in; it is to *bring out* that which you already possess though you know it not; to bring out powers of mind and strengthen habits of industry, so as to enable you to de velop and use those powers.

A man is like a rough stone, it may be a good stone, and fit to be made into a thing of beauty, but as yet lying rough and ugly. A cunning artizan takes the stone and smoothens it and polishes it and fashions it till he makes it into something which for centuries after all men will look at and admire. He has not put any thing into the stone, only brought out its latent beauty and made it into an ornament for all ages, and this is what education does for you.

It is education that polishes you and furnishes you, brings you out of savagery into civilization, leads you out of darkness into light, out of dishonor and falsehood, into a life of truthfulness and uprightness out of the old life of corruption, trickery and intrigue into a new life of honor, honesty, probity and integrity, so that your light shews amongst men, and when the end of your life comes, as come it must, you are able to face the unknown future calmly and happily, feeling that while your strength lasted, you have tried to do good and to refrain from evil. You look the whole in the face, proud and confident because your career has beon blameless.

Education is intended to bring out all that is good in you, and to induce you, by a well regulated course of discipline to conserve at their best all your faculties thereby enabling you to exert those talents with which God has blessed you, as well as to His glory as to the welfare of those around you."

So with the close of a College career we should not close our books—the eternal teachers of mankind; nor should we place a high price upon a lawyer's calling or a magistracy. We shall not be worthy sons of our country if we fail to do our most to develop the country's resources so as to better the lot of our own brethren; and it matters but little how insignificant our own measure may be in the life of a nation if one has but done whatever he can with his limited capacities and means.

---

सुटी :— पुढील आठवड्यांत दीपवाळीचा मोठा उत्साह असल्यामुळें येत्या सोमवारचा म्हणजे तारीख २४ आक्टोबर १८९२ इसवीचा वऱ्हाडसमाचारचा अंक निघणार नाहीं. सालाबाद प्रमाणें आमचे प्रिय आश्रयदाते आपली ही रजा मंजूर करितीलच असा भरंवसा जाणून आम्ही या सणाची सुटी मामुला प्रमाणें घेतली आहे.

---

## वऱ्हाड

हवामान:— चित्रा नक्षत्राचा थोडा पाऊस पडला. मध्यंतरी दोन दिवस उष्मा विशेष भासला. किरकोळ दुखणीं बळावलीं आहेत. शेतकीचीं कामें जारीनें चालूं आहेत.

येथील पोलिस सुपरिनटेंडेंट मि. केंबरलीज यांनीं आपले जागेचा चार्ज नवीन बदलेले मि. काटग्रेव्ह यांस गेल्या मंगळवारीं दिला. केंबरलीज साहेब अकोल्यास गेलीं आठ वर्षें आहेत. हे अधिकारी कामांत दक्ष, कडकडीत वर्तनाचे, आणि नीतिमान असे आहेत. यांची कारकीर्द अकोला जिल्ह्यास चांगली लाभली त्या प्रमाणेंच पुढें उमरावती जिल्ह्यास लाभो असें आम्ही इच्छितों

आज पासून अकोल्यास सेशन सुरूं होईल.

रा. रा. वामन नारायण चापट एक्स्ट्रा असि० कमिशनर हे रजेवरून परत गेल्या सोमवारीं आपले जागीं रुजू झाले आणि मि. मुबारक अली एक्स्ट्रा असि० कमिशनर हे परत मोर्शीस आपल्या जागीं रवाना झाले.

येथील डेपुटी कमिशनरचे कायमचे क्लार्क आफ कोर्ट निवर्तल्या कारणानें मि. सैफुद्दीनखा यांस शंभर रुपये कायमचा पगार करून सध्यां आक्टींग क्लार्क आफ कोर्ट नेमलें आहे. आणि त्यांच्या अकोला स्माल कोडताचे क्लार्क आफ कोर्टाचें जागीं रा. रा. यशवंत मोरेश्वर काळे यांस उमरावती स्माल काज कोडतांतून घाडलें.

रा. रा. केशवराव यशवंतराव देशमुख मालगुजार, बेंच- माजिस्ट्रेट- थर्ड क्लास, नांचणगाव जिल्हा वर्धा हे सुमारें १३०० रुपयांचे दागिनें अकोल्यास विकण्यासाठीं खुद्द घेऊन आले. गेल्या १२ तारखेस तोच विकीचा माल चोरींतला आहे असा संशय आल्या वरून त्यांस त्यांच्या नोकरा सुद्धां येथें गिरफ्त करण्यांत आलें आहे. पोलीस तपास जारीनें चालू आहे. खरोखर पापाचा घडा भरत आला असावा! तारीख १३ रोजीं लेफ. हेग साहेबांचें कोडतांत सदर्हू इसमानें अपराधा बद्दलचा कबूल जबाब ही दिला आहे. हें चोरीचें प्रकरण कोठवर लांबेल व किती लोकांस मागील दुष्कर्माचा झाडा द्यावा लागेल हें पक्कें कळत नाहीं. गेल्या शनवारीं पोलिसा कडून मि. अजिजुद्दीन यांचे कोडतांत खटला चलान झाला. बारिस्टर वगैरे येणार असल्याचें कळतें सदरहू नरपुंगव मालगुजर यास आमचे येथील सराफ रा. रा. शंकर बाळकृष्ण पुणेकर यांनीं मुद्देमालासुद्धां मोठ्या शिताफीनें पोलिसांत नेऊन गुदरले हें त्यांस भूषणास्पद आहे. घोर कर्मीचे गुन्हे पत्यांत आणण्यास सराफ व सोनार यांस अनेक प्रसंग येतात तेव्हां त्यांनीं वरील उदाहरणाचा कित्ता द्यावा असें आम्ही सूचवितों.

रा. रा. रघुवीरसिंह दुनियासिंह चिफ कानस्टेबल अकोला हे गेल्या डिपार्टमेंटल परीक्षेंत सर्व प्रांतांत पहिले आले हें कळविण्यांस आम्हास संतोष वाटतो.

---

नादारी मुकदमा नंबर २३ सन १८९२

नमुना ( जी )

विद्यमान नादारी कोर्टीचे जडज्य मि० अंबादास संतो ए० अ० कमिशनर आणि सिव्हिल जडज्य जिल्हे वाशीम.

सर्वत्रांस नोटीस देण्यांत येतें कीं, गणु वा॥ निंबाजी बाजड रहाणार मौजे नावली प्रगणें सिरपूर ता० वाशीम यानें आपणास आपणास नादार ठरवावें म्हणोन ह्या कोर्टास अर्जे केला आहे. आणि तारीख ८ माहे नवंबर सन १८९२ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसाईनी नेमून देण्या करितां व नादारानें आपले सुटकेविषयीं दिलेल्या अर्जीचा विचार करण्या करितां नेमला आहे.

करितां सदरहू गणु वल्लद निंबाजी बाजड—नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टाप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जीनें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तकार सांगणें असेल ते आणि त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांव नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

या कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावें नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि तो यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी. म्हणजे ते दावे रजिष्टरीं दाखल करितील. तारीख १० माहे आक्टोबर सन १८९२ इ०

सही

अंबादास संतो

सिविल जडज्य आणि नादारीकोर्टीचे जडज जिल्हा वाशिम.

---

नोटीस

ति० रा० रा० शामराव गंगाराम निरकड राहणार अकोट यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, माझी बायको मरण पावली तेव्हां आपण तिच्या मुलामुलींच्य नीट व्यवस्थे साठीं व्यवहार मार्गानें तिचे वडील म्हणून तिच्या व मुलांच्या आंगावरील दागिने किंमत सुमारें ३०० तीनशे रुपयाचे आपणापाशीं तसेंच ठेवून घेतले. आतां पांच वर्षें होऊन गेलीं, मुलगा सज्ञान आहे व ते दागिने व आमच्या जवळचा ऐवज मिळून आह्मांस त्यांच्या साठीं कायमची व्यवस्था करणें आहे तर ते दागिने अठ दिवसांचे आंत पोचते करावें. तसें केलें नाहीं तर आह्मी कोडतात फिर्याद करून पैसे वसूल करूं आणि भलाई सोडून गैरविश्वासानें दागिने बांबविले असें सिद्ध झाल्यास फौजदारींत ही प्रकरण चालवूं. कळावें. तारीख १४ आक्टोबर १८९२ इ०

( सही ) नारायण कृष्ण पाटील आकोट दरतुर शामराव कृष्णपाटील खुद्द.

---

नोटीस

रा. रानुजी रवाळे, गुणाजी वल्लद राणोजी, बायनी मर्द राणोजी, पश्चदी मर्द कृष्णाजी, भामटे राहणार शाहापूर तालुके दर्यापूर जि० इलिचपूर यां सर्वांस:—

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमची मुलगी माझी लग्नाची बायको असून कांहीं वेळ लहान असतां माझें येथें होती. नंतर तुह्मी घेऊन गेले. आज शहाणी होण्यास पुष्कळ दिवस झाले. आह्मी चार वेळ नेण्यास आलों परंतु धाडली नाहीं याज करितां नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत आणून घालावें. व तिनें ही यावें. आणून न घातल्यास व तिनें न आल्यास कायद्या प्रमाणें फिर्याद करून ताब्यांत घेतली जाईल. सदरहू नोटीशीचा खर्च तुमच्यावर पडेल म्हणून दिली नोटीस. ता० १३—१०—९२ इ०

( सही. )

कृष्णाजी वल्लद रामजी भामटे राहणार आलेगांव हल्लीं विवरें तालुके बाळापूर निशाणी खुद्द.

---

## वर्तमानसार.

पुण्याचा एक गृहस्थ ठाणें अरुणोदयास लिहितो कीं,

१ प्रो. टिळक हे गायकवाडांच्या तर्फेनें अमेरिकेंत चिकागो प्रदर्शनास जाणार आहेत.

२ प्रो. आपटे मेले ते स्थोवेळीं मरतील असें महाडच्या बोलिक भविष्यवाद्यानें पूर्वीच सांगून ठेवलें होतें व त्याच्या सांगण्याप्रमाणें अगदीं बरोबर त्यांचा मृत्यु झाला.

३ त्या महाडकरानें आणखी दोघां नामांकितांचाही असाच मृत्यु सांगितला असून त्यांतील एकाचा आणखी चार महिन्यावर व दुसऱ्याचा पांच वर्षांवर आहे.

अमिराच्या फौजेनें अर्जगन हें ठिकाण आपल्या ताब्यांत घेतलें.

हशीम अल्लोवर जाण्याची हिंदुस्थानसरकारची तयारी झाली व सर लोकर्ट यानें आपल्या फौजेसह गेल्या मंगळवारीं इंदु नदी वलांडून बुधवारीं बायो या ठिकाणावर हल्ला केला व गुरुवारीं तें ठिकाण सर केलें. लोकांकडून ह्मणण्यासारखीं फारशी हरकत झाली नाहीं.

अमीर हा लार्ड रावर्टची भेट जलालाबादेस खेचित घेणार अशी पेशावर व काबूलच्या दरम्यानच्या लोकांची खातरी अहे व त्या करितां अमीर लवकरच काबुलाहून निघणार आहे.

मोरोको कोर्क रेलवे रशिया लवकरच खरेदी करणार.

रशिन सरकार मध्य एशियांत लवकरच एक ट्रेनिंग कालेज सुरूं करणार आहे.

चित्रवळचा नवा मेहेतर हा, गादीचा खरा वारस जो आपला वडील भाऊ तो वासीन प्रांत बळकावून बसल्यामुळें त्याच्यावर हल्ला करून जात आहे.

मि. उइलियम डिग्बी हे हिंदुस्थानच्या येत्या राष्ट्रीय सभेस येण्याकरतां विलायतेहून इकडे येण्यास निघाले.

हिंदुस्थानच्या जंगलखात्याकरितां पसंत करावयाच्या उमेदवारांच्या बाबतीत हिंदुस्थानसरकारानें एक वेगळा ठराव प्रसिद्ध केला आहेत.

चित्रळच्या गादीवर वारसा सांगणारे दोघे भाऊ आपसांत लढाई करण्याच्या तयारीत असून दोघेही हिंदुस्थान सरकारची मदत मागत आहे.

चिलास सरहद्दीवरही कांहीं गडबड दिसत असून त्यांणीं कांहीं लोकांस ठार केलें अशीही बातमी आहे.

बकू येथें हिंदुंचें देवालय आहेः— या बकू ठिकाणीं हिंदुंचें एक शिवालय आहे व तेथें पुजाऱ्याचें काम करणाराही हिंदुच असतो. हा पुजारी हिंदु बहुधा पंजाबांतला असतो व तो एकदा जाऊन पुजाऱ्याच्या कामावर रुजू झाला ह्मणजे दुसरा कोणी हिंदु तेथे जाऊन पुजाऱ्याच्या कामावर रुजू होई पर्यंत दाहा दाहा, पांच पांच वर्षे त्यासच पुजाऱ्याच्या कामावर राहावें लागतें, हें बकू ठिकाण कास्पियन समुद्राच्या वायव्य किनाऱ्यावर आहे व तेथें जुन्या काळीं हिंदुचीं फार मोठी वस्ती असून तेथील बहुतेक व्यापार हिंदुच्याच हातांत असें. हें शिवालय किती मोठें, किती मजबूत व किती सुशोभित आहे. याचें कच्चे वर्णन देण्यापेक्षां त्या देवालयांतील एक लहानशी गोष्ट सांगितली ह्मणजे त्यांची सर्व कल्पना सहज मनांत यण्यासारखी आहे

ती गोष्ट ही कीं, त्या देवालयाच्या गाभाऱ्यांत, सभा मंडपांत, आवारांत व ओवऱ्यांत दररोज मोठा दीपोत्सव होत असून तो सर्व दीपोत्सव ग्यासाच्या ह्मणजे धुराच्या दिव्यांचा असतो! इतकेंच नव्हें तर तो ग्यास तयार कोठें कसा होतो आणि तो कोण तयार करतो आणि या ठिकाणीं कोठून कसा आणला आहे याचा तपास, आजच्या शोधक काळांतल्या कोणाही मनुष्यास अजून लागला नाहीं! ! या असल्या गोष्टी बाजून आमच्या भ्रष्टचित्ती सुधारकांच्या मनांवर कांहीं प्रकाश पडेल तर ते अंध मार्गाचा रस्ता सोडून सरळ मार्गास लागण्याचा संभव आहे.

वायव्यप्रांतांत अलहाबाद, बनारस, आग्रा व बरेली येथें माजिस्ट्रेटांचीं कोर्टे व पोलिस आफीस यांच्या दरम्यान बोलतां येणारी टेलीफोन यंत्रें सुरू केलीं आहेत असें सांगतात ठा॰ अ॰

मद्रासेस टपालच्या खात्यांत कांहीं सुधारणा करणार आहेत, त्यावरून टपालच्या शिपायानें त्या पेटींतील पत्रें घेऊन घर काढलीं किंवा नाहीं हें कळेल.

इंग्लंडाहून येथा एकंदर ४४ नवीन सिविल सर्वंट येणार आहेत. पैकीं मद्रासेत ६, मुंबईत ६, बंगाल्यात ८, पंजाबांत ५, ब्रह्मदेशांत ७, मध्यभागांत २, वायव्येकडील प्रांतांत ९, व आसामात १, असे नेमिले आहेत यांपैकीं ५ नेटिव आहेत.

साबणो दिवस्या— राकेलांत शेंकडा ३ तीन प्रमाणें साबण मिसळून तेल तापविल्यास त्यांच्या चौगल्या वड्या होतात त्या ज्वालावयाचे कामीं उपयोगी पडतात. त्याकार मंथ जळतात. सु॰ प॰

काठेवाड टाइम्स पत्रावरून समजतें कीं, मालिअ संस्थान गेल्या आठवड्यांत काठेवाडचे पोलिटिकल एजटांनीं दोन युरोपियन कामगार पाठवून जप्त केलें आहे.

सर्पवृक्ष -- मेक्सिको देशांत एका पर्वत शिखरावर एक सर्पवृक्ष आहे. त्या बद्दल एका प्रवाशानें लिहिलेला स्वानुभव "हार्टफर्डकुरंट टाइम्स" मध्यें प्रसिद्ध झाला आहे. हे झाड ९० फूट उंचीचें असून सर्पा प्रमाणें त्याची आकृति दिसतें व त्याच्या शाखा वगैरे आंगास आळे पिळे देत असतात. सदहूं प्रवाशी त्या वृक्षा जवळ गेला, तेव्हां एक पक्षांचा थवा त्या झाडावर येऊन बसला. ते पक्षी वर बसतांच जमिनीकडे वांकलेल्या त्याच्या फांद्या हात वर करावा त्या प्रमाणें आपोप वर होऊन त्यांणीं त्या पक्ष्यांस गराडा घातला, व पक्ष्यांनीं किलबिल शब्दानीं ओरड सुरू केला. कांहीं वेळानें रक्त शोषण होऊन चिपाटा सारखे झालेले कांहीं पक्षी खालीं पडले ह्या झाडा खालीं पक्ष्यांच्या हाडाची वगैरे रास दिसल्या वरून तें झाड पक्षी भक्षक आहे असें सदहूं प्रवाशास वाटलें व आणखी अनुभव घेऊन पाहावा ह्मणून दुसऱ्या दिवशीं कांहीं कोंबडीं घेऊन तो त्या वृक्षाजवळ गेला, व कोंबड्यांचा स्पर्श त्या सर्प वृक्षास करितांच तीं झेपाटूं लागलेलीं दिसलीं; त्या वरून तर ह्या प्रवाशाची पुरेच खात्री झाली! भुतलावर परमेश्वरानें अशा अद्भुत वस्तु करून ठेविल्या आहेत त्या चा कोणाला ठाव लागला नाहीं.

कायदे कौसिलाचा कायदा नुकताच पास झाला व त्यांत निवडणुकीच्या तत्वाचा समावेश करावा असें लंडन येथील प्रतिनिधीच्या समेत ठरलें होतें. तो कायदा हिंदुस्थान व प्रांतिक सरकारच्या विचाराखाली असून निवडणुकीच्या तत्वाचा समावेश कसा करितां येईल या संबंधानें त्याचे विचार चालू आहेत. बंगाल सरकारचें यासंबंधानें विचार बाहेर पडले आहेत. नवीन कायद्या प्रमाणें बंगाल कौसिलमध्यें २० मेंबर असणार व त्यापैकीं फक्त सहा निवडलेले असावयाचे. हे सहा मेंबर निवडण्याचा अधिकार 'बेंबर आफ कामर्स' युनिव्हरसिटी वगैरे मंडळ्यास व १०,००० वर कर देणाऱ्या म्युन्सिपालिट्यांस मिळणार! सरकारच्यावतीचे लोक कौसिलमध्यें जास्त असावे व सरकारास मताधिक्यानें कोणताही ठराव पास करतां यावा या उद्देशानें हा कायदा पास करण्यांत आला नसून लोकांच्या गरजा काय आहेत, त्यांना कोणत्या सुधारणा इष्ट आहेत इत्यादि गोष्टींचें योग्य ज्ञान करून देणारे खरे पुढारी कायदे मंडळांत पाठविता यावे या साठीं कायद्यांत निवडणुकीच्या तत्वाचा समावेश करावा ह्मणून सूचना करण्यांत आल्या होत्या. बंगाल सरकारच्या या ठरावावरून बंगाल लोकांस समाधान वाटेल असे आह्मांस वाटत नाहीं या कामीं मुंबई सरकार कोणत्या रीतीनें आपलें कर्तव्य बजाविते हें पाहणें आहे! न्या॰ सिं॰

## जाहिरात

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुस्त्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसता? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विकीस व दरिद्री लोकांस फुकट तयार असतात; परंतु त्यात ज्या हटकून गुण खात्रानें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जो दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्यालयुपेबलनीं पोस्टमार्गे लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसाची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्यावें दोन औषधी मिळून कि. १॥ रु.

३ धातुगत ज्वर ह्मणजे चवथारें हिव ताप त्याच क्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. कि. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १॥९ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोड्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा कि. १ पुड्यास ८१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे वडवे वटसो बाधा व मदर सर्व तऱ्हेचा कि. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास कि. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस कि. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस कि. ॥।

जुलाब उग्रम राजस तकलीफ अगदीं न सून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल कि ।। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस कि. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्मावर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस कि १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशीश याजवर दर डबीस कि. १८=

१३ हागवण व अतिसार १ डबीस कि. १।=

१४ व्रपण एकारस्यास व बुद्धीस १ डबीस कि. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस कि. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय जळून रक्त जाणें व संधि दुखणें ह्मावर १ डबीस कि १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस कि. १८-

१८ गर्मी उर्फ उपदंश सर्वांवो विकार सर्व यांजवर १ डबीस कि. १॥ रु.

१९ फसवी उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस कि. ॥। हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुड, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस कि. १॥ रु. हो २ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास कि. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस कि. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फुल वडस रातांधळें लाली खपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस कि. १८६

ह्या शिवाय पोष्टेज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेश मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैद्य कुरणखेडकर अकोला गंगावरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

☞ हें पत्र अकोलें येथें के॰ बा॰ खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराचा किमत

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
साहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास .....०४

SUBSCRIPTION
Rs.
Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly.....3 " 8 as
Single copy.....4as

नोटिशीचे दर.

१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .....०।

# वऱ्हाडसमाचार.

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition pe line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 31 OCTOBER 1892 NO 42

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख ३१ माहे आक्टोबर सन १८९२ इ० अंक ४२

इ० नं० ११ पैकीं क्लास नं० १९ मिसल नं० १६

१८९२

विद्यमान अंबादास संतो सिव्हिल जडून जिल्हे वाशिम.

नोटीस सर्वत्र लोकांस देण्यांत येते कीं विठोबा वल्लद मारोती तेली राहणार मौजे मोप परगणे रिसोड तालुके व जिल्हे वाशिम हा तारीख १०।१२।९० इसवी रोजीं मरण पावला. मयताचें कर्ज लोकांकडे येणें आहे तें वसूल करण्याकरितां सन १८८९ चा आक्ट ७ प्रमाणें वारसाचें सरटिफिकीट मिळावें म्हणून चिनकाजी वल्लद विठोबा तेली अज्ञान पालन करणार मातोश्री सोनाई मर्द विठोबा तेली राहणार मोप ईनें या कोर्टास अर्ज केला त्यावरून नोटीस देण्यांत येते कीं वरील अर्जाचे चौकशीची तारीख १६ माहे नोवेम्बर सन १८९२ मुकर्र केली आहे. सबब जो कोणी मयताचा जवळचा वारीस असेल त्यांनीं वरील तारखेस दाहा वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें. कळावें. ता. २४।१०।९२

( सही ) अंबादास संतो
सिव्हिल जडून जिल्हे वाशिम.

---

नोटीस

रा रा. तुकाराम वल्लद रघुजी पाटील राहणार काळगव्हाण तालुके दर्यापूर यांस—

या नोटीशीनें खालीं सही करणार इसकडून नोटीस देण्यांत येतें कीं चिरंजीव बळीराम हा अज्ञान असल्यामुळें तुम्ही चुलते म्हणून अज्ञानाचे पालणकर्ते सरकार मार्फत ठरले आहां परंतु सर्व इस्टेटीचा व शेतीवाडीचा कारभार चालविण्यास तुम्हाला मदतगार म्हणून रा. रा. नारायणगीर गुरु गुलाबगीर यांस मी व माझी सवत नामें यशोदाबाई मिळून मुखत्यार नेमलें परंतु त्यांच्या गैरशिस्त कामकाजामुळें मी तें मुखत्यार पत्र रद्द केलें आहे. तुम्ही त्या मुखत्यारा कडून सर्व हिशोब समजाऊन घ्यावा आणि त्यास रजा द्यावी. तुमच्या व आमच्या विचारा प्रमाणें नवा मुखत्यार नेमण्यांत येईल व. पण तुम्ही हयगय करून सदहूं रद्द केलेल्या मुखत्याराला पूर्वी प्रमाणेंच काम पाहूं दिलें तर नुकसान होईल आणि त्याची जबाबदारी तुमच्या शिरावर राहील तर तुम्ही ही नोटीस पोचताच सर्व कारभार स्वताच अज्ञानाचा पालण कर्ता म्हणून करण्यास लागावें म्हणून हें कळविलें आहे. तारीख २२ आक्टोबर सन १८९२ इसवी

सही
पार्वती जवंजे शिवराम पाटील राहणार काळगव्हाण इच्या हातची निशाणी बांगडी.

---

## बरार रूरल लॉ.

## नियम.

( ३७ वे अंका वरून पुढें चालू )

१८ बोर्डाचे हिशोबाप्रमाणें शिलक कंट्रोलरचें लिहिण्यावरून बदलली जाण्यास पात्र.

तथापि हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ही शिलक कंट्रोलर यांचे लिहिण्यावरून दुरुस्त केली जाण्यास पात्र आहे.

१९ चेक ज्या महिन्यांत दिला तो धरून तीन महिने पर्यंत चालू.

चेक ज्या महिन्यांत दिले गेले तो धरून तीन महिने पर्यंत चालू राहील. उदाहरण ज्या चेकाची तारीख ११ जानेवारी आहे तो ३१ मार्च पर्यंत चालूं राहील.

न वठवलेले किंवा मुदती बाहेर केलेले चेक व तत्संबंधी व्हौचराची व्यवस्था कशी करणें:—

न वठवलेले चेकाची रकम किंवा ठरविलेले मुदती नंतर देणें राहिलेले चेक मुदती बाहेर गेल्यामुळें रद्द होतात त्यांची रकम त्या महिन्याचे हिशोबांतून " वठवलेले किंवा रद्द झालेलें चेक नंबर ता० " यांत त्या महिन्याच्या खर्चांतून वजा करून क्याश बुकांत पुन्हा जमा कराव्या तेणेंकरून तो खर्च महिनेवारी हिशोबांत दिसणार नाहीं. नेव्हां एखादा चेक वठवला नसेल किंवा मुदती बाहेर गेल्यामुळें रद्द झाला असेल तेव्हां ज्या व्हौचरावरून तो दिला तें व्हौचर बोर्डाचे आफिसांत ठेऊन घेतलें पाहिजे व ज्या महिन्यांत तो खर्च दाखविला असेल त्या महिन्याचे हिशोबा बरोबर पाठवावा.

२० तालुक बोर्डानीं आपले क्याश बुकांची नकल जिल्हा बोर्डाकडे महिन्यांतून दोन वेळां पाठवावी.

सर्व डिस्ट्रिक्ट फंडाचा देवघेव जिल्हा बोर्डाचे हिशोबांत बरोबर दाखल करितां यावी म्हणून प्रत्येक तालुक बोर्डानें आपले जिल्ह्याचें बोर्डाकडे महिन्यांतून दोन वेळां त्याचे जमेचे व खर्चाचें क्याश बुकाची नकल पाठवीत जावी म्हणजे त्या महिन्याचे ता. १२ व ता. २८ रोजीं त्यांत अनुक्रमें मागील महिन्याचे ता० २९ पासून चालूं महिन्याचे ता. १२ ( धरून ) पर्यंतची देवघेव व ता० १३ पासून ता० २८ ( धरून ) पर्यंतची देवघेव दाखल करावी. हीं पत्रकें आल्यावर प्रत्येक तालुक्याची ह्या जमेची व खर्चाची एकुणांत मात्र जिल्हा बोर्डाचे क्याश बुकांत दाखल करावी लागेल.

तथापि मार्च महिन्याच्या ता० १३ पासून ता० ३१ पर्यंतची देवघेव जिल्हा बोर्डाकडे पाठविलेले क्याश बुकांचे नकलेत सामील करावी.

चलावणी व बिल क्याश बुकावरोबर पाठविणें.

ज्या चालावणी बरोबर तालुक बोर्डाचा वसूल सब-ट्रेझरींत भरणा केला त्या चलावणी व ज्या व्हौचरा वरून पैसा आदा केला तो व्हौचरें क्याश बुकाचे नकले बरोबर पाठवावी.

२१ चेकाचे राजेस्टर दरारोज भरणें.

दिलेले चेकाचें राजिस्टर रोज लिहीत जावें व बंद करीत जावें. कोष्टक ५ चे एकुणांतील मेळ दररोज व दर महिन्यास क्याश बुकाचे एकुणातीशीं मिळविली पाहिजे कोष्टकें ६ व ७ हीं महिन्याचे अखेरीस पास बुकावरून भरावी एखादे न वठवलेल्या किंवा मुदतीबाहेर गेलेल्या चेकाची रकम कोष्टक ८ यांत दाखवावी. कोष्टकें ७ व ८ याच्या एकुणातीचा मेळ कोष्टक ९ शीं ठेवावा.

२२ जिल्हा बोर्डाची हिशोब दिपुटी कमिशनरकडे तिसरे तारखेस पाठविणें.

---

## उनाड मुलगा.

इकडे इतक्या जोरानें हात हिसकून घेतल्यामुळें मास्तरांचा हात थोडा दुखूं लागला. पण नाऱ्याला माराचें भय वाटतें इतकें त्यांना समजून आल्यामुळें उद्यां उचल बांगडी करून गुळामाला शाळेंत आणून खूप चोपावा म्हणजे क्षणांत नरम होईल, असें वाटून त्यांस आनंद झाला. तो मनांत म्हणाला. लोक किती तरी वेडे हे, पहिल्यानें मुलांचे लाड करितात, डोकीवर बसवून घेतात, आणि पुढें टोणपे निघाले, म्हणजे रडत बसतात.

भाग ३ रा

नाना मास्तरांनीं कबूल केल्या प्रमाणें दुसरे दिवशीं, शाळेतील दोन तीन दांडगी मुलें नाऱ्याची उचल बांगडी करून आणण्या करितां पाठविलीं. तीं सकाळींच आऊच्या घरीं आलीं. नाऱ्या ओसरीवर डोळे चोळीत बसला होता. आऊ घरांत कांहीं कामांत गुंतली होती. नाऱ्याला पाहतांच तीं सर्व मुलें एकदम त्यावर पडलीं, आणि कोणी हात, कोणी पाय असा त्याला पकडून घेऊन चालले. नाऱ्या म्हणला, अरे तुमी मांडले आहे काय? तुम्ही कोण? मला नेता कोठें? हें आहें तरी काय? तुम्ही मला कोठें नेणार हें जर सांगितलें, तर मीच आपल्या पायांनीं येईन. हीं शाळेतील मुलें आहेत, हे दोन मुलांना उचल बांगडी करून शाळेंत नेतात, याची त्याला कल्पना ही नव्हती. म्हणून नाऱ्यानें प्रथम दांडगाई मुळींच केली नाहीं. मुलें करतील तसें त्यांस करूं दिलें. त्यावरून त्या मुलांस नाऱ्या आपल्या आटोक्यांत आला, आतां कोठें जाईल, असें वाटलें. शिवाय आपल्या पायीं जाण्याचें त्यानें कबूल केलें होतें, म्हणून त्यांनीं त्याला उभें राहूं दिलें, दोन मुलांनीं दोहोंकडून त्याचे हात मात्र आपल्या हातांत गच्च धरून त्याला मोकळें केलें आणि म्हणालें, नाऱ्या, गुलामा जर का दांडगाई केलीस, तर शाळेंत गेल्यावर मास्तरांकडून तुला खूप मार देववूं.

शाळा आणि मास्तर हे शब्द नाऱ्याच्या कानीं पडतांच तो कावरा बावरा झाला आणि त्यांच्या हातून सुटण्याची त्यानें पराकाष्ठा केली परंतु तो पडला एकटा, त्याचा इलाज चालेना. शेवटीं त्यानें जवळच्या एका मुलाच्या खांद्याचा इतक्या जोरानें चावा घेतला, कीं तेथून भळभळां रक्त वाहूं लागलें. तो मुलगा मोठ्यानें ओरडला. त्या सरशीं सर्वांचें लक्ष्य जखमी मुलाकडे जाऊन नाऱ्या मोकळा सुटला. तो पळत घरी येऊन, बागेतून सरळ समुद्र किनाऱ्यावर गेला.

काल संध्याकाळीं झोंपाळ्यावर बसून आऊशीं गोष्टी करीत होते, तेच मास्तर व त्यांनींच ही मुलें आपल्यास पकडून नेण्याकरितां पाठविलीं हें नाऱ्याच्या स्वप्नीं ही नव्हतें. तसेंच आपल्या बदल आऊनें त्यांच्याशीं गोष्ट काढिली असून, तिच्या मनांतून आपण शाळेंत जावेंसें आहे, हेंही त्याला ठाऊक नव्हतें. वास्तविक झटलें तर उचल बांगडी करून नाऱ्याला शाळेंत नेण्याची युक्ति नाना मास्तरांचीच होती. आऊला ठाऊक होतें कीं जुलुमानें नाऱ्या ताळ्यावर येणार नाहीं. उलटें जुलूम करूं लागलें तर नाऱ्या पळून आपल्या घरीं निघून जाईल, किंवा दुसरे कोठें जाईल किंवा जीव देखील देईल अशी तिला धास्ती होती. म्हणून झालेला प्रकार तिला समजला, तेव्हां तिला आवडला नाहीं म्हणून तिनें नाऱ्याच्या शोधार्थ भिकूला ( नाऱ्याचा मामा ) पाठविलें.

नाऱ्यानें चावा घेतल्या मुळें, मुलगा अक्राळविक्राळ ओरडला, व जखमेंतून रक्ताचा पाट चालला हें पाहून सर्व मुलें घाबरलीं. असें वर सांगितलेंच आहे. जखमी मुलगा बेहोष होऊन जमिनीवर पडला, हें पाहून तर एकच गोंधळ झाला तेथें पुष्कळ लोक जमा झाले. त्यांत त्या मुलाचा बाप ही आला. त्यांनीं त्याला पट्ट्या वेगेरे बांधून रक्त बंद केलें व डोळ्यांस पाणी लावून तो कांही वेळानें शुद्धीवर आला. मग त्याला घरीं नेऊन पोंचविलें.

नाना मास्तरांना ही खबर पोंचतांच ते मोठ्या वेगानें शाळेंतून निघून त्या मुलाच्या घरीं समाचाराकरितां गेले. त्या मुलाची ती स्थिति पाहून त्यांस फार वाईट वाटलें. खिन्न होऊन त्या मुलापाशीं बसले. त्यांच्या तोंडातून एक शब्द ही निघेना. तेथें दुसरे लोक पुष्कळ होते. त्यांपैकीं कित्येक नाना मास्तरांस उद्देशून टोंचून बोलत होते. कित्येक नाऱ्याला शिव्या देत होते. त्या मुलाच्या आईनें तर मास्तरांस व नाऱ्यास शिव्यांची लाखोली वाहिली. ती म्हणाली " येऊं दे त्या मेल्या नाऱ्याला इकडे, गुलामाला ठार मारून टाकत्ये. असला कसला बाई मुलगा हा! मेला मागल्या जन्मी राक्षस होता कोणी. आतां आला आहे ब्राह्मणाच्या कुळीं " त्या रांडेच्याला कुठली विद्या. नाहीं का मेला जाई शाळेंत. आणि शाळेंत न्यायचेंच होतें तर माझ्या गणू बाळाला कशाला पाठविलें त्याला

न्यायपक्ष. गावांत थोडीं का मुलें होतीं. नाऱ्याच्या बापाला काय भीक लागली आहे? एक स्वतंत्र गडी त्याला पोंचवण्या करितां ठेवायचा होता. आणि मास्तरांना नव्हती का अक्कल, त्यांनीं कां आमच्या बाळाला पाठविलें. त्यांना कशाला आमच्या मुलाचो काळजी मेला तर दुसऱ्याच, त्यांचें काय जातें" असें त्या बाईचें तोंड एक सारखें चाललें होतें.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध ११ शके १८१४

वऱ्हाड सरकारनें फिर्यादी अर्जीयांच्या उपयोगा साठीं नवीन मोहरदार, जाड व टिकाऊ असा कागद काढिला आहे. त्याचा प्रत्येक ताव अर्धा फुल्सकेप कागदाच्या आकाराचा आहे. सरकारी किंमत प्रत्येक तावा मागें एक पैसा आहे. या नव्या कागदाचा उपयोग कोर्टफीचो टिकिटें लावलीं जाणाऱ्या कागदावर करावा आणि जेथें स्टांप लागत नाहीं अशा फिर्यादी व अर्जी या कागदावर कराव्या अशी स्टांप म्यानुअल मध्यें सुधारणा झाली आहे. या कागदाचा उपयोग डेपुटी कमिशनरांनीं होईल तितका वाढवावा अशी ही सूचना आहे. परंतु या कागदावरच जर कोणी फिर्याद अगर अर्ज न करील तर त्या मनुष्याला चांगला टिकाऊ कागद वापरण्या विषयीं सक्ती करावी अशा बद्दल स्टेट सेक्रेटरीचा हुकूम आहे.

वरील हुकूम अंमलांत आणतांना अकोल्याचे डेपुटी कमिशनर कप्तान मारिस यांनीं आपल्या ताब्यांतील कोडतांस व कचेऱ्यांस अशा मतलबाचा हुकूम फर्माविला आहे कीं गेल्या १७ वे तारखे पासून पुढें या नव्या कागदावर फिर्याद किंवा अर्ज घेतले जावें ह्या हुकूमाचा अर्थ इतर कागद वापरण्या विषयी मनाई केली आहे असा येथील कोडतांनीं ठरवून त्या प्रमाणें त्याची अंमल वारी चालविली आहे. स्टांप म्यानुअल प्रमाणें हा मनाईचा हुकूम गैरकायदा आहे आणि हा हुकूम तोडल्या पासून ज्याचें नुकसान होईल त्याला वऱ्हाड सरकार वर दावा करून भरून घेतां येईल असें आह्मास वाटतें.

अकोल्या सारख्या मुख्य जिल्ह्याच्या ठिकाणीं अशा मनाईच्या गैरकायदा हुकमाला लोक मोठा अडथळा आणतील असें आह्मास वाटलें होतें. परंतु आमच्या येथील सरकार दरबारातून हालचाल करणारे लोक व मुख्यत्वें करून येथील हुषार, वाणीदार व नामांकित वकील गूपचूपपणें नव्या कागदाच्या उपयोगाची सक्ती अक्षरशः कबूल करितात हें नवल आहे. अकोला जिल्ह्या प्रमाणें सक्तीचे हुकूम इतर जिल्ह्यांत सुटल्याचे आह्मास कळलें नाहीं तेव्हां या जिल्ह्यापूरतीच सध्यां विचार आहे. नाहींतर चंचुप्रवेश येथें झाला ह्मणजे वाहिवाटीच्या जोरावर मुसलप्रवेश सर्वत्र होण्यास विलंब लागणार नाहीं. आमचें ह्मणणें असें नाहीं कीं सरकारी नव्या कागदाचा उपयोग होऊं नये पण काय ती तक्रार एवढीच कीं त्याच कागदाच्या उपयोगा विषयीं जबरी न करितां राजीखुषीचा मामला ठेवावा.

---

महाराणी सरकारचे प्रतिनिधी लार्ड लान्सडाऊन यांची स्वारी सिमल्याहून गेल्या गुरुवारी निघून कलकत्त्यास तारीख ८ दिसेंबर रोजीं दरबार भरविणार असल्या विषयीं सूचीपत्रकें प्रसिद्ध झालीं आहेत. बाटेनें लाट साहेब हैद्राबाद, बंगळोर, म्हैसूर आणि मद्रास इकडून पुढें कलकत्त्यास आगबोटीनें जाणार आहेत. व्हाइसराय हैदराबाद रेसिडेन्सी मध्यें येत्या तिसऱ्या तारखेस दरबार भरविणार आहेत आणि त्या निमित्त निजाम सरकारच्या राजधानींत कडकोट तयारी चालली आहे. त्या मुलाखतीच्या वेळीं कांहीं राजीक प्रकरणांचा विचार निजाम सरकारापाशीं व्हाइसराय साहेब करणार आहेत असें ह्मणतात. निजाम साहेबांनीं सरहद्दीच्या प्रकरणांत टोलेजंग मदत दिली आहे तिच्या बद्दल ही निकाल लागणार असावा.

परंतु व्हाइसराय साहेबांची प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें व निजाम सरकारच्या राज्यांत तुरळक पटकीचा वारा असल्यामुळें त्यांची स्वारी राईपास न जातां थेट हैदराबादेस जात आहे. निजाम दरबारची सांपत्त स्थिती चांगली नाहीं. रेव्हिन्यू सेक्रेटरी नबाब मुस्ताग हुसेन यांनीं राजिनामा दिला व त्या सरशी त्यांस हद्दपार ही सात दिवसांत केलें. नबाब मेहदी हुशेन होम सेक्रेटरी सध्यां कामावरून दूर आहेत. आणखी विविध लचांडें त्या दरबारीं उद्भवलीं आहेत तेव्हां असा बखेडा बाहेर पडण्याच्या प्रसंगीं व्हाइसराय साहेब हैदराबादेस येत आहेत ही गोष्ट व्यवहाराच्या दृष्टीनें चांगली नाहीं तरी ईश्वरकृपेनें सर्व प्रसंग साजरा होईल.

---

अलहाबाद हायकोडताचे न्यायाधीश नामदार महमद साहेब यांनीं फलीं रजा घेतली तेव्हां त्यांच्या जागीं नेटीव न्यायाधीश नेमतील अशी आह्मास मोठी उमेद होती; पण हिंदुस्थान सरकारनें नेटिवांचे हक्कांचा विचार करण्याच्या बाबतींत कानावर हात ठेविला असें दिसतें. नेटिवासाठीं मोक्या दर्ज्याच्या जागा अगदींच मोजक्या आहेत आणि त्यांत वायव्य प्रांतांतील मुख्य हायकोडताच्या एका न्यायासनाच्या जागे वरील नेटीवांचा हक्क बुडविला जावा हें बळी तो कानपिळी या मासल्याचें उदाहरण नव्हे काय? गेल्या आठवड्यांत काशीस येत्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीस जाणाऱ्या प्रातिनिधींची निवड करण्या साठीं एक जंगी सभा भरली होती त्यावेळीं बाबू सुरेंद्रनाथ बानरजी यांच्या सहयानें वरील जाणून बुजून केलेल्या चुकीच्या वर्तना बद्दल खेद प्रदर्शित करण्याविषयीं ही एक ठराव सर्वानुमतें पसार झाला.

---

सोन्याची किंमत आमच्या देशाच्या रुपेरी नाण्यांत कितीही वाढली तरी खरोखर आह्मांस नेटिवांच्या अहिताची मोठी भिती नाहीं. जो पर्यंत आमच्या रुपयाला पूर्वी प्रमाणें तितकाच माल मिळतो तों पर्यंत त्या चढाओढीच्या भावाची अगदीं फिकीर नाहीं. ज्याला या देशांत पैसे मिळवून सोनेरी नाणें चालतें अशा इंग्लंडा सारख्या देशांत खर्च करावे लागतात त्यांनां या सोन्याच्या तेजी पासून भिती आहे. असें लोक मुख्यत्वें करून आंग्लो-इंडियन आहेत आणि त्यांनें - च सभा स्थापून विलायत सरकार मार्फत एक कमिशन मागून घेतलें आहे. त्यांच्या विज्ञप्ती प्रमाणें कमिशन बसविण्याचें ठरलें व लार्ड हरशल्स यांस त्या कमिशनचे मुख्य नेमलें. या कमिशननें आपल्या स्वकीय बंधुवर्गाचा पक्ष न घेतां व प्रजेच्या हिताहिताच्या गोष्टी दृष्टीपांत आणून विचार करावा एवढींच आमची इच्छा आहे. या कमिशना समोर मुख्य प्रश्न दोन आहेत ते असे कीं, सोनेरी व रुपेरी अशीं दोन्ही नाणीं चालूं करावी अगर रुप्याचीं नाणीं नियमित पाडून सोन्याच्या नाण्यांशीं रुप्याच्या किंमतीचें प्रमाण एक कायम करावें आणि त्या भावा प्रमाणें सोन्याचीं नाणीं जो कोणी मागेल त्यास सरकारच्या खजिन्यावर देण्यांत यावीं अशा दोन सूचना आहेत. हिंदुस्थानच्या राज्यकारभारा निमित्त विलायतेस जे पौंड पाठवावे लागतात त्या बद्दलचा बोजा आम्हाबरचा वाढतो आहे पण तो हलका करण्यास या दोनी ही सूचना निरुपयोगी आहेत.

---

निजाम सरकारचे होम-सेक्रेटरी नवाब मेहदी हुशेन यांचा लौकिक सध्यां दोन गोष्टींनीं महशूर आहे. त्यांची धर्मपत्नी एक मठ्ठम असून तिच्या व यांच्या दंपत्यपणाला विरोधी व प्रतिकूळ अशीं वर्तमानें पसरलीं ह्मणून त्यांनीं अब्रू कमविण्या साठीं त्या वृत्तान्तप्रकाशकांवर फिर्याद चालविली आहे. हा प्रयत्न असलेल्या अब्रूच्या कायमपणा साठीं चालला आहे. दुसरा त्यांनीं दीर्घ उद्योग 'लंडन टाइम्स' ला पत्रें लिहिण्याचा केला. त्या पत्रांत इंग्रजांचे गोडवे गाऊन राष्ट्रीय सभेचा विध्वंसतोष व राजद्रोह दाखविण्याचें श्रेय त्यांनीं आपल्या पदरीं बांधलें. हा प्रयत्न नूतन प्रसिद्धीस फार सोपा व सुलभ वाटला असावा.

अलिकडे लोकांच्या डोळ्यांत भरण्यास मोठासा गुण किंवा अवगुण लागतो असें नाहीं. राष्ट्रीय सभा, ह्यूम साहेब वगैरे संबंधानें खोडातोडीचा जंगी वाद काढावा ह्मणजे पुष्कळ साफल्य होतें. नबाब मेहदी हुसन हे एक लंडन टाइम्सला आपले सोयीवार हत्यार मिळालें, त्या बरोबर त्या पत्रकारानें आपला नेहमीचा बालसंतोषी स्वभाव, नेटिव लोकांविषयीं द्वेषबुद्धि व राष्ट्रीय सभेचा तिरस्कार हीं सुरेख रीतीनें व्यक्त केलीं पण ज्या हत्यारानें इतरांच्या राजनिष्ठेची छाटाछाट केली त्या शस्त्रास वृथा महत्व मनस्वी आलें. मेहदी हसन हे एक नेटिव मुत्सद्दी ठरले. त्यांची इंग्रजी भाषेवर हुकमत छानदार चालते असें ठरलें. परंतु 'हिंदू'च्या समजाप्रमाणें तो लेख कोणी तरी तिऱ्हाइतानेंच लिहिला असावा. विचारसरणी तर्कशास्त्रा प्रमाणें पायाशुद्ध असून माहिती ओतप्रोत व इत्थंभूत आहे असा शिवाय निराळा लंडन टाइम्सचा शेरा आहे. नबाब मेहदी हसन असे विजयध्वजी मुत्सद्दी खरोखर आहेत असें मानावें तर त्यांचा प्रभाव हैदराबाद दरबारच्या निजामशाईवर कां पडूं नये आणि त्या संस्थानचा बोभाटा कां बंद होऊ नये! कांहीं सिद्धान्त जसे पक्के व ठरीव असतात त्या प्रमाणें राष्ट्रीय सभेचे उद्देश व ह्यूम प्रभृति लोकांचे विचार ठाम व अनुभविसिद्ध आहेत तेव्हां त्यांच्या सत्यतेबद्दल बाद कोणी काढल्यास त्या गोष्टींत वृथा चर्वित चवण करण्याचें प्रयोजन नाहीं. ह्मणून आह्मी मेहदी हुसेन यांच्या पत्राचा विचार करीत बसत नाहीं.

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER

31 1892.

---

We have a complaint to make against the Deputy Commissioner of Akola. We would however lodge it before Captain Morris against his own self. We do this advisedly. We know how the official routine goes on. Oftentimes orders are issued without their four corners being fully examined; and we have to note today one of such occasions. The full meaning of a circular lately published under the title of 'Registered amendment to Stamp Manual' is misunderstood and a signal measure adopted to enforce it has undone the original intention of the recent amendment. Colonel Lane has introduced specially water-marked petition-paper for general use in courts and offices. The clauses quoted below will point out how and when the petition-paper will be used:—

"(2) The water-marked petition paper is intended for use with adhesive court fee labels and for petitions and applications to courts and offices on which no stamp is required.

(3) Deputy Commissioners should afford every facility to petition writers for supplying themselves with water marked petition paper at local and branch depots, and the use of any other paper for petitions should be generally discouraged. If the water-marked paper is not used, the use of stout paper of some kind is to be insisted on (Secretary's No. 2660, dated 15th July 1891, to Commissioner)."

Upon the strength of theses clauses Captain Morris has caused orders to be issued to the different courts in the district under his control. The orders are worded in an unfelicitous manner. They convey a meaning that is quite inconsistent with the provision in the sentence *'If the mater marked paper is not used, the use of stout paper of some kind is to insisted on.'* The current orders are understood all around in a prohibitory spirit. The heads of courts & offices are strict & rigorous to the very letter of these orders, and are determined to refuse petitions and applications written on all sorts of paper excepting the water-marked petition-paper. This is indeed exorbitant and in contravention of the amended Stamp manual in force We request therefore that Captain Morris will set the matter right at his earliest convenience and will issue a general order in purview of the clauses we have quoted above. So far as regards the district of Akola. We are not informed of a similar anamoly in the other districts.

Granted that the order is right and should be followed to the very letter: what would be he consequences in the long run? Many inconveniences and hardships such an order will entail upon the parties that resort to our courts. In the first place the sale of the water-

marked petition-paper will be clogged. No petition writer will facilitate the use of it since he is not paid for it like licensed vendors. Secondly, people will find it a nuisance to buy these papers in and out of office-hours at local and branch depots. Thirdly, the paper is very costly. It costs three pies per sheet.i. e. Rs. 15 per ream of Foolscap. While paper of a similar quality can be had at a quarter of the above price. If the use of petition paper will be continually upheld parties that are fighting at their arm's length would include in the costs of the suit the price of the—petition sheets used in it and the court cannot reasonably refuse such costs. Fourthly, if a suit be written on a plain paper and presented on the last day allowed by the Limitation Act the courts will not admit it because it is not on the petition-paper. The question will then arise whether the suit will be time-barred. Every court will be within the limit of its authority to decide the suit as a barred one. If carried further the losing party will be entitled to sue the State Secretary for damages because the order acted upon is not a legal one and sets a bad instance. Lastly, the petition-paper is intended for use with adhesive court fee labels. This means an additional tax of one pice for each sheet of a proceeding to which such labels are affixed. Besides where stamp need not be used the petition paper is to be used for petitions and applications to courts and offices. What is then the definition of the terms 'petitions' and 'applications'? Every document, in its ordinary idiomatic sense that a man can present in respect of his diverse affairs related to the duties of an officer or Judge as such, is rightly within the sphere of the above terms. To prescribe for such documents the use of the petition paper is to dig up the exploded custom that a tenant must grind at the mill of his landlord. Such a measure restricts the individual freedom of action and levies a new duty of an unjustifiable nature. We have put forth these points in order to bring Captain Morris to our side so that he may reconsider and cancel his current order.

What is again this petition-paper? It is just like an ordinary half-sheet of foolscap paper with an ornamental water figure of an oblong in geometry The *prima facie* aim seems to discourage the use of thin, light & flying sheets that will be unworthy of a shelf in the record office. Some people in their ways of stinginess and miserly nature used the worst sort of paper which would not last for a mere handling of it. To remedy this evil Col. Lane manufactured, in right earnest of his departmental earnings, the present petition paper. To our plain mind the registered amendment to Stamp manual looks like the prospectus of a shop. By the supply of the pelition paper Col. Lane advertises to those who resort to courts and offices that his sheets are valued most in those circles and that no individual has the right to question the stoutness of them and parties may go glidingly on by the use of them. Col. Lane's petition-paper is just like the solid pure gold of the National Bank and his water marks are like the genuine trade-marks of the Bank. So the amenment is a mere invitation to people to go to his office; but if he means to earn a good custom we would request him to check any trespass upon his amenment. Then let the Deputy Commissioners encourage the free-trade of the petition-paper.

## वऱ्हाड

हवामानः—या पंधरवाड्यांत पावसाळ्यानें पुन्हां उलट घेतली. गेल्या बुधवारीं एक दोन घटकाभरांतच मोठी जंगी पर्जन्यवृष्टि झाली. खरीपाचीं पिकें फार बुडालीं. हा पाऊस बहुतेक सार्वत्रिक झाला आणि त्या बरोबर लोकांचीं नानाविध नुकसानें झालीं. रोगराई विशेष नाहीं. एकंदर पाऊस ९१ इंच होऊन गेला.

कर्नल मेकंजी साहेब कमिशनर वऱ्हाड हे काल दिवसचे गाडीनें हैदराबादेस गेले ते बहुत करून व्हाइसराय साहेब गव्हरनर जनरल यांस भेटण्यास गेले असावेत. असें समजतें

डायरेक्टर आफ लँड रिकार्ड्स आफिस येत्या पांचवे तारखे पासून अकोल्यास कायम केलें.

येत्या नववे तारखे पासून वऱ्हाड शिक्षक समाजाच्या वार्षिक बैठकीस प्रारंभ होईल.

येथें नुकत्याच आलेल्या 'करुणेश प्रासादिक' बाशिमकर नाटक मंडळीनें परवां रात्रीं शांकर दिग्विजय नाटकाचा खेळ करून दाखविला.

मि. आग्रेडी एक्स्ट्रा असि० कमिशनर इलिचपूर हे तीन महिन्यांचे रजेवर जात असल्या कारणानें मि. एदलजी संजाना एक्स्ट्रा असि० कमिशनर बडनेरा यांस इलिचपुरास नेमून रा. रा. एकनाथ मोरेश्वर कान्हेरे तहशिलदार, दारव्हा यांस बडनेरा केंपबर आफि० ए० असि० कमिशनर नेमणार असें कळतें.

क्याप्टन बारन हेस्टिंग डेप्युटी कमिशनर इलिचपूर यांस तीन आठवड्या साठीं अधिकारी कामा निमित्त हैदराबादेकडे स्पेशल ड्युटीवर धाडल्यामुळें त्या गैरहजिरींत तेथील पोलीस सुपरिनटेंडंट मि० राईट यांस आक्टींग डेपुटी कमिशनर नेमलें.

गेल्या दीपवाळीच्या सुमारास कर्नल मेकंझी, मि. बुलक, कर्नल लेन, मि. इलियट इत्यादि निरनिराळ्या खात्याच्या वरिष्ठाच्या स्वाऱ्या चिखलदऱ्यास जमल्या होत्या. प्रयोजन काय होतें तें कळलें नाहीं. त्याच प्रमाणें कमिशनर साहेब उभाउभी मलकापुरा पर्यंत जाऊन उमरावतीस परत गेले.

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं यवतमाळचे इंग्रजी मराठी शाळेचे हेडमास्तर व आक्टींग डेपुटी इनस्पेक्टर रा. रा. सुंदर दामोधर दवणकर यांस देवाज्ञा झाली गृहस्थ स्वभावानें चांगला होता म्हणून त्यांच्या मरणानें आप्तमित्र मंडळीस फार दुःख होईल. त्यांच्या १०० च्या रिकाम्या जागीं रा० रा० रघुनाथ सदाशिव बर्वे यांस इतवर्गावर्गी करून ५० वर नेमलें.

असिस्टंट कमिशनर्स, एक्स्ट्रा असि० कमिशनर्स आदि करून अधिकाऱ्यांची हायर लोअर पुढील सालच्या एप्रिल महिन्यांत होतील असा हुकूम निघाला आहे. त्या महिन्यांतील अमूकच तारखा असें मागाहून मुक्रर करण्यांत येईल.

गेल्या महिन्याच्या आरंभीं हायर व लोंअर परीक्षा झाल्या त्यांत अनुक्रमें १७ व ११ गृहस्थ एक एक अगर दोन दोन विषयांत उतरले आहेत त्यापैकीं हायर मध्यें हशमत अली, विष्णू हरि, पी. थेरीस ( मयत ), शाहू दाजी, सय्यद महमद, सय्यद फरोझ हुसेन, आणि नारायण रावचंद्र हे सातजण व लोअर मध्यें आर. ए. सिम्पसन आणि शामराव हे दोघे गृहस्थ यंदाच्या व मागील परीक्षा मिळून गोळाबेरजेनें हायर व लोअरच्या संपूर्ण परीक्षेंत पसार झाले.

अकोला तालुका बोर्डाचे इलेक्शन गेल्या मंगळवारीं होतें परंतु त्या बद्दलची जाहीर खबर योग्य मुदतींत चुकीनें न दिली गेल्यामुळें येत्या १६।१७ तारखेस इलेक्शन होईल.

डाक्टर रेली जेल सुपरिनटेंडेंट आकोला यांनीं बेअब्रूचा लेख रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई वकील यांज विषयीं लिहिला होता. त्या बद्दल राजश्री देसाई यांनीं नेटानें फिर्याद सेशन कोर्टा पर्यंत नेली असें पाहून डाक्टर निराशेनें खट्टू होऊन ओशाळले आणि त्यांनीं आपल्या गैरशिरत लेखा बद्दल फिर्यादी पाशीं माफी मागितली.

शेट पोपटलालचे गुमास्ते राजश्री नेमीचंद यानी स्वदस्तूरच्या जमाखर्चा विषयीं खोटी प्रतिज्ञा केली म्हणून मि० अजिनुद्दीन यांनी खटला केला होता त्यांत विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर यांचे कोर्टांत आरोपी दोषमुक्त ठरला.

दर्यापूरचे धर्मार्थ दवाखान्या वरील हास्पिटल असिस्टंट मि० परमश्री दयाळ यांनीं पेनशन घेतल्या वरून मेसर्स आब्दूल मजीद, थम्बुस्वामी पिले, शेख अब्दूल रहिमान यांची अनुक्रमें दर्यापूर, देऊळगांव राजा व वाशीम येथील दवाखान्यावर वर्गावर्गी झाली आहे.

वऱ्हाडच्या वकिलीच्या परीक्षेंत पसार झालेल्या गृहस्थांचीं नांवें रेसिडेन्सी आरडर्स मधून प्रसिद्ध झालीं तीं येणें प्रमाणें :— परशराम जनार्दन पाटककर ( मयत ); बाबाजी महादेव दिक्षित, नारायण काशिनाथ दाते; आणि बाळकृष्ण रामचंद्र ओक.

रा. रा. गणेश अनंत वैद्य हेड क्लार्क डायरक्टरचे आफिस हे एका वर्षाच्या फर्लो रजेवर गेले होते परंतु त्यांनीं ती रजा कमी करून आपल्या जागेचा गेल्या आठवड्यांत चार्ज घेतला.

गेल्या लक्ष्मी पूजनाचे दिवशीं शेट बालचंद मोतीलाल यांच्या वाड्यांत घरफोडी संपूर्ण होत होती परंतु शेजाऱ्याच्या चाहुली मुळें चोराचा बेत फसला आणि ते चलनी नाण्याचे बदरे फेंकून पळाले. २५०० रुपयांचा एक तोडाच या लटापटींत चोरांच्या हातीं लागला असें शेटजी सांगतात.

## लिलाव

मेहरजी जानस्टन आणि कंपनी नं० ४ फार्बीस आणि मेडोज स्ट्रीट-फोर्ट-मुंबई

मुंबई जुडिकेचरच्या हाय कोर्टांत साधारण अस्सल दिवाणी हुकमत सन १८९२ च्या ६व्या इंडियन कंपनी च्या आक्टांतील बाबदींत आणि आकोला म्यानुफ्याकचरिंग कंपनी लिमिटेड ( जी लिक्विडेशन मध्यें आहे ) तिच्या बाबदींत. एन. सी. म्याकलीआड एसक्वायर....आफिशिअल लिक्विडेटर.

मेसर्स मेहरजी जानस्टन आणि कंपनी लिलाव करणार यांज कडून या लेखा अन्वयें जाहीर केलें जातें कीं, त्यांच्या लिलांव आफिसा मध्यें जाहीर लिलावानें १४ नोवेंबर सन १८९२ सोमवार रोजीं दिवसा ४॥ वाजतां अकोला म्यानिफ्याक्चरिंग कंपनी लिमिटेड इच्या कर्जाची व्यवस्था लावणारे आफिशिअल लिक्विडेटर मे० एन. सी. म्याकलीआड यांच्या हुकुमा अन्वयें ज्या जिनगीची विक्री करण्यांत येईल ती कलमवारीनें येणे प्रमाणें:—

कलम १:—वरील कंपनीची सर्व जमीन व तिजवरील सर्व निरनिराळे जागेचे भाग आणि त्या वरील एक लहान, व एक मोठा असे दोन बंगले, इतर सर्व इमले आणि कंपौंडातील बाजूचीं घरें यांज वरील सर्व हक्क, स्वामित्व, व मिळकत वगैरे मिळून सर्व वरील जमीन जुमला वऱ्हाडांतील अकोले शहरीं आहे व त्याचा विस्तार लांबी रुंदी धरून ६१७८७ चौरस यार्ड अगर या जवळ जवळ इतकेच यार्ड असून त्याची चतुःसीमा येणे प्रमाणें:— उत्तरेस—कांहीं भागाला चांदबिबीची जागा व कांहीं भागाला पडीत जागा, दक्षिणेस व नै-दक्षिण बाजूस बखळ जागा, पूर्वेस सार्वजानिक सरकारी बगीच्या कडील असलेली व त्यानें व्यापलेली जागा व पश्चिमेस मोकळी जागा. ही नमूद केलेली जमीन सन १८८६ च्या सप्टेंबरच्या २७ सावे तारखेच्या कौलपट्या प्रमाणें ठरवून दिलेली असून कौलपट्टा दस्तुर नेमणजी जामास्पजी सी. आय. इ. आणि बिरार आईल मिल्स कंपनी लिमिटेड या उभयतामध्यें झाला आहे.

कलमं २—१० हॉर्स पॉवरचा एक डबल फल्यूबायलर, २५ हॉर्स पावरचें एक इंजिन, पॅटर्नदर्सिचे २८ रेचे, ड्रयुवुइट पेटंटचे १५ तेलाचे घाणे, एक स्क्रू कातण्याचा चरक, एक स्टीम चेस्ट, एक पाणी तापवण्याचें यंत्र, एक बायलरचा टॉन्की, एक रिचवण्याचें टॅन्क, एक इंग्रजी बी स्वच्छ करण्याचें मशीन, एक इंग्रजी बी चुरण्याचें यंत्र, दोन इंग्रजी लियानें चुरळण्याचे व दळण्याचे मिल, एक ग्रायन्डिंग स्टोन, एक जॅक, इंग्रजी ड्रिलींग मशिन, लॉरी वजन करण्याचें मशिन, फरनिचर, कातड्याचे पट्टे, कायर रोप, पुलीज, शॉफ्टींग, स्टीम पाइप्स, स्टीम पम्पस्, लन्टस, हत्यारें व यांत्रिक सामान, स्टोअर्स, कोळसे, आणि वर निर्दिष्ट केलेल्या जागेंतील सर्व इतर वस्तू आणि इतर नफ्याच्या बाबी, आणि तसेंच वरील कंपनीच्या व्यापाराच्या सवलती आणि इतर मिळकती.

या हरासाची विशेष माहिती व शेर्तीं कळण्यासाठीं वर सांगितलेल्या आफिशियल लिक्विडेटरचे अटर्नी मेसर्स वाडीया आणि गांधी चर्च गेट स्ट्रीट फोर्ट घरनंबर १९ यांजकडेस, किंवा फारबीज आणि मेडोस्ट्रीट मधील खाली सही करणाऱ्यांच्या आफिसांमध्यें अर्ज करावा. तारीख २८ माहे आक्टोबर सन १८९२ इसवी.

मेहरजी जानस्टन आणि कंपनी
मुंबई आक्टोबर २०
सन १८९२

## वर्तमानसार.

दादाभाई यांचें आगमन होण्याचा संभव- यंदा अल्हाबाद उर्फ प्रयाग येथें राष्ट्रीय स भा भरावयाची आहे. त्या सभेचें अध्यक्षस्था- न नामदार दादाभाई नौरोजी यांनीं स्वीका- रावें अशी हिंदुस्थानांतील एकंदर स्यांडिंग काङ्ग्रेस कमेट्यांचें मत आहे. व त्या प्रमाणें दादाभाई यांस कमेट्यांकडून सूचना ही गेली आहे, असें टाईम्स आफ् इंडिया पत्रास खा- सगी रीतीनें समजलें असल्याचें समजतें. हें आमंत्रण दादाभाई यांनीं कबूल केल्यास दिसंबर आरंभीं विलातेहून येणाऱ्या डाकेंतून दादाभाई हे हिंदुस्थानांत येतील, आणि रा- ष्ट्रीय सभेचें काम आटपण्या वरोबर पुन्हा विलायतेस परत जातील, असें त्याच पत्रक- र्त्यानें लिहिलें आहे. दादाभाई हे पार्लमेंटचे मेंबर झाले आहेत तेव्हां नेटिव पार्लमेंट मेंबर राष्ट्रीय सभेसारख्या नेटिवांचा दाद विलाय- तेस लावणाऱ्या सभेचे अध्यक्ष झाले असतां राष्ट्रीय सभेस एका विलक्षण प्रकारचें स्वरूप प्राप्त होईल यांत संशय नाहीं.

फ्रान्स देशांत एका रेलवेवरून एका स- णानिमित्त पुष्कळ लोक आगगाडींतून दुस- ऱ्या गांवीं जात होते. लोक इतकें होते. कीं अर्ध्याच माणसांनीं सगळ्या गाड्या भर- ल्या बाकीच्या मंडळीला जनावरांकरितां ज्या गाड्या असतात त्यांतून जाण्याचा प्रसंग आला! आइत्या वेळेला लांकडांचे टोकळे मां डून त्यांवर फळ्या आडव्या टाकून कंपनीनें त्या गाड्यांत लोकांना बसविलें. गुरांच्या गा- ड्यांत आपल्यास बसविलेलें पाहून गुरांप्रमा- णेंच कंपनीशी वागण्याची कल्पना एकाच्या मनांत आली! तिकिटें तपासणारानें एका गा- डीशीं येऊन तिकिट मागितल्या बरोबर वरी- ल मनुष्यानें तिकिट न दाखवितां गुरांसारखें ओरडून दाखविलें! तीच कल्पना वसरून त शा सर्व गाड्यांतील सर्वच लोकांनीं निकडे तिकडे तसें ओरडण्यास सुरुवात केली. ति- किट तपासणारा कंटाळून परत गेला. पुढच्या स्टेशनावर स्टेशन मास्तर तिकिटें पहावयास आला, त्याला सर्व क्षणभर गुरें बनलेल्या मंड- ळींनीं तसाच वाटेस लावला. शेवटीं उतरा- वयाचें स्टेशन आलें, तेव्हां तेथें सर्व मंडळीं- नीं गाडींतून उतरून ज्या वाटेनें मनुष्यें जातात त्या वाटेनें न जातां गुरें जाण्याची जी वाट होती तिकडून मंडळी गुराप्रमाणें उड्या मारीत चालली! स्टेशन मास्तरानें एकाच्या गळपट्याला धरून त्याची मान वा- किवली, तशी सर्वच मंडळी माना खाली करून स्याच्यावर धावली व त्या बरोबर मा- स्तरांनीं पळ काढला! तेव्हां एकदा सर्व मंड- ळी खूप मोठ्यानें हांसली, व जवळच रे- लवेचा एक कामगार होता त्याच्यापाशी तिकिटें देऊन चालती झाली. शु. सू.

रबरी नौका—मांचेस्टर येथील चार्लस म- मिन्टॉश आणि कंपनीनें इंडिया रबराच्या नौका आणल्या आहेत; ह्या वाऱ्याच्या योगानें पाण्यांतून जलद नेता येतात व कधींही बुडत नाहींत. सुमारें बारा फूट लांबाची बोट ४५ शेर असते.

न्यूयार्क येथील एका कुशल चित्रकारानें क्लीव्हलंडचा देखावा काढला आहे, त्यांत त्यानें आपल्या संभाषणाचें उतारे संक्षिप्त रीतीनें "शेडिंग" रूपानें भरले आहेत; त्यांतील शब्दसंख्या १३००० आहे व तीं अक्षरें स्पष्ट वाचतां येतात; कित्येक शब्द वाचण्यास मात्र सूक्ष्मदर्शक यंत्रे लावावीं लागतें!

चीन व रशिया यांच्यांत व्यापार संबंधाचा एक तह लवकरच होणार आहे.

जर्मनसरकार साठ हजार फौज आण- खी वाढवीत आहे.

निझामहैदराबादेस दोन बीमच्छ खटले चालू आहेत, पैकीं एक बूक छापल्याचा असून त्याबद्दलचा रपोट वेळीं न पाठविल्या बद्दल होम सेक्रेटरी मेहेदी हसन यांस निझा मानें सस्पेंड केलें आहे. दुसऱ्या खटल्याबद्दल स्पेशल मानि. नेमले आहे.

गव्हनरजनरलांच्या व इलाख्याच्या का- यदेकौसलांत सुधारणा करण्याच्या बाबतींत पंजाब शिवाय सर्व इलाखे सरकारांनीं आपले रपोट हिंदुस्थान सरकारकडे केले.

पामीरची मालकी रशिया किंवा आफ- गाण या पैकीं कोणाची असल्यामुळें इंग्लंडा- नें उगीच बसावें कसें कित्येकांचे म्हणणें आहे.

नास्त द्रिल करण्याच्या संबंधानें विला- यतच्या फौजेंत नाखुषी वाढत आहे व त्या बद्दल पोर्ट मोथे येथें दोघांस कैद केलें आहे.

फ्रेंच व डाहमी यांच्यांत सामना होऊन फ्रेंचांचे २४ मेले.

बुखारा आगबोट खडकावर आपटून फुं- टली व त्यांतील ऊतारू मिळून १७० बु- डाले व ३४ जीवंत मिळाले.

अफ्रिकेंत शिरलेल्या जर्मन लोकांवर अ- फ्रीदीलोकांनीं हल्ला करून लुटले व कांहीं मारले.

चिन दंग्यामुळें लुशाई लोक उठण्याची भिती असल्यामुळें इंग्रजीफौज लुशाई हद्दींत जात आहे.

चिकोगो व न्यूयार्क यांच्या दरम्यान प्र- दर्शनाकरतां टेलीफोन सुरू करणार.

भेटीस आलेल्या वजिर लोकांस अमिरा मदत न केल्यामुळें ते वजिरा लोक इंग्रजांच्या तर्फचे होत आहेत. ठ.० अ०

## नोटीस

रा. रा. नारायणगिर गुरु गुलाबगीर रा- हणार वरूडे अगर काळगव्हाण तालुके दर्यापूर यांसः—

खाली सही करणार इजकडून नोटीस दे- ण्यांत येते कीं मी व माझी सवत नामें य- शोदा या दोघींनी मिळून तुह्मास मुखत्यार पत्र करून दिलें आहे. तें देण्यांस कारण कीं आमचा मुलगा नामें बळीराम हा अ- ज्ञान आहे व त्याचा चुलता तुकाराम हा- अज्ञानाचा पालणकर्ता सरकार मार्फत ठरला आहे तरी भावोजींच्या हातून सर्व शेती भातीचीं कामें व फिर्यादीचीं कामें वेळेवर होईनात ह्मणून तुह्मास त्यांच्या व आह्मा उभयतांच्या सल्ल्यानें सर्व कामें मुखत्यारी नें चालवितां येण्यासाठीं तुह्मास मुखत्यार नमून घेतलें. पण हल्लीं माझ्या नजरेस दि- सून पडतें कीं तुह्मी आपलें काम नीटपणें, व्यवस्थेनें व चोखरितीनें करीत नाहीं अगर तुमच्या हातून होऊं शकत नाहीं. आणि याच कारणास्तव मी तें मुखत्यार पत्र या लेखानें रद्द करीत आहे. तुह्मी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचें आंत मु- खत्यारी दिल्या तारखे पासून अखेर हिशोब रुजू करून देईं तारखे पावेतो केलेल्या का- चा हिशोब द्यावा आणि त्या पुढें आम- च्या स्थावर जंगम इस्टेटी संबंधानें हरएक कोणत्या ही प्रकरणांत तुम्ही हात घालूं नये. या नोटिशीच्या तारखे पासून जो कोणी तु- मच्याशी आमच्या इस्टेटी संबंधानें देवघेव करील तो त्याजबद्दल आह्मास अगर आम- च्या जिनगीस जबाबदार धरूं शकणार नाहीं.

अज्ञान पालणकर्ते राजश्री तुकाराम त्या- च्या हातून जिनगीची नीट व्यवस्था न रा- हिल्यामुळें त्यांच्या ऐवजी जिनगीवर दे- खरेख करण्याचा व भावोजीच्या कामाला मदत करण्याचा अधिकार मालक मुलगा नामें बळिराम याच्या मातोश्री या नात्यानें आम्हा उभयता सवतीकडे आहे परंतु धाक- ट्या यशोदाबाई यांचा अधिकार माझ्या व- डीलपणाच्या नात्याला धरून चालला पा- हिजे ह्मणून मी स्वता माझ्या स्वतांच्या आणि यशोदाबाई वरील हक्काच्या व ना- त्याच्या अधिकारानें तुमचें मुखत्यारपत्र रद्द या नोटीशीच्या तारखे पासून रद्द केलें आहे.

मुकत्यार पत्र रद्द केल्याच्या मितीं पा- सून तुह्मी न जुमानता कांहीं आमच्या इ- स्टेटी विषयीं व्यवहार केला तर त्याजब- द्दल तुह्मावर फिर्याद करून सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. तारीख २२ अक्टोबर सन १८९२ इसवी

सही

पार्वती जवेज शिवराम पाटील

राहणार काळगव्हाण इच्या

हातची निशाणी बांगडी

## जाहिरात

कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औष- धी विकीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्री- नें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्त्यावर पत्र पाठवा- वें. ह्मणजे आम्ही व्ह्यालयुपेबलनीं पोस्टमार्गे लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरु- स्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं व त्यांनीं विकी करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ धातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारे हिंव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणा- रे कितीही दिवसांचे असो, त्यावर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्याच्या डबीस १८९ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व को- ड्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ८१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे वडवे वटसी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर २ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।=

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शू- ळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं न सून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात हो- ण्यास व गर्भधारणास बंदेज बायांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धाशिश यावर दर डबीस किं. १८=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें बायावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १८—

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ यावर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥। हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज घ मु- खरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुळें व २ पुरु- षांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दि- वसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळती यावर १ डबीस किं. १८६

ह्या शिवाय पोष्टेज निराळा पडेल.

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेश मागवून विकी करील त्यांनीं विकी करून पैसे मागा हून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर

वैद्य कुरणखेडकर अकोलें गंगावरचे

माडीवर चौकांत दवाखाना.

वऱ्हाड.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० बा० खं- डेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमा- चार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.